| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २८६ वा | गुरूवार दिनांक २९ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### बोअरची वायर व तांब्याच्या तारे सह दिड लाखाची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भिमराव चंद्रभान मुळीक, वय ५० वर्षे, रा. रुई ता. परंडा जि. धाराशिव यांचे बावची रोडला श्री उमाकांत कापसे यांचे शेतात रुई येथील विहीरवरील व बोरची वायर, ४ एम एम चे विहिरवरील मोटारीचे जाळुन तांबा काढलेली केबल असा एकुण १,५०,००० किंमतीचा माल आरोपी नामे- रमजान हजरत मुजावर, वय ३२ रा. कसबे तडवळा ता. जि. धाराशिव यांनी दि.२७.०१.२०२६ रोजी ०५.०० वा. सु.कोयत्याचा धाक दाखवून घेवून जात असताना मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भिमराव मुळीक यांनी दि.२७.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याच्या दागिणे सह रोख रकमेची चोरी

कळंब(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी निशिकांत भागवत पाटील, वय ५७ वर्षे, रा. मस्सा खंडेश्वरी ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी-कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२५.०१.२०२६ रोजी कापुन आत प्रवेश करुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम १०,००० व बापुराव बाबुराव इंगोले, वय ६६ वर्षे, रा. मस्सा खं यांचे घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३५,००० असे एकुण ७, ३२, ३८५ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-निशिकांत पाटील यांनी दि.२७.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५,३३१ (३, ३३१ (४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शेतातील स्प्रिंक्लरची अज्ञाताने केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी सदाशिव हरिशचंद्र राठोड, वय ७० वर्षे, रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांचे खानापुर शिवारातील शेत गट नं ४४ मधील स्पिंक्लरचे १६ नग एकुण १५,००० किंमतीचे हे दि. २६.०१.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सदाशिव राठोड यांनी दि.२७.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### शेतातील स्प्रिंक्लरची अज्ञाताने केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालाजी रमेश शिंदे, वय २६ वर्षे, रा. केशेगाव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल मोरे कॉर्नर ईसाफ बॅकेसमोर डीआयसी रोड धाराशिव येथुन खानापुर अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. आंनदनगर पो ठाणे येथ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# १५० दिवसांचा कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श ; जिल्हा राज्यात तृतीय

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या नेतृत्वाचे राज्यभर कौतुक






धाराशिव दि.२७ जानेवारी (जिमाका) राज्य शासनाने प्रशासनात अधिक पारदर्शकता, गतिमानता निर्माण व्हावी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासकीय उपक्रम व सुविधांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचावा,या उद्देशाने १५० दिवसांचा विशेष कृती कार्यक्रम राबविला.या कार्यक्रमांतर्गत सर्व उपक्रम प्रभावीपणे व गुणवत्तापूर्ण रीतीने अंमलात आणण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार धाराशिव जिल्ह्यात प्रशासन अधिक सक्षम,तंत्रज्ञानस्नेही व नागरिककेंद्रित करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या.यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणाली,तुळजाई चॅटबॉट, कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर प्रणाली तसेच जीवनरेखा प्रणाली या महत्त्वाच्या डिजिटल उपक्रमांचा समावेश आहे.

डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणालीद्वारे जिल्ह्यातील विविध विभागांच्या शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे.या प्रणालीमुळे योजनांची उद्दिष्टपूर्ती, प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे व वेळेत पाठपुरावा करणे अधिक कार्यक्षम पद्धतीने शक्य झाले असून प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे.

तुळजाई चॅटबॉट - ही प्रणाली नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.या माध्यमातून पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, नैसर्गिक आपत्ती,आपले सरकार सेवा केंद्रावरील सेवा याबाबतची माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. जिल्हा संकेतस्थळाशी संलग्न असलेल्या या प्रणालीवरून नागरिक घरबसल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती, योजना पात्रता तसेच शंकांचे तात्काळ निरसन करू शकतात. मोबाईल,लॅपटॉप किंवा संगणकावर सहज वापरता येणाऱ्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचून प्रशासन अधिक गतिमान झाले आहे.

कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर प्रणाली ही शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.शासन निर्णय,कायदे, परिपत्रके यांची एकत्रित व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणाऱ्या या प्रणालीमुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ,अचूक व जलद झाले आहे.जीवनरेखा प्रणाली ही शेत रस्त्यांशी संबंधित एक महत्त्वाची डिजिटल व्यवस्था असून, जिल्ह्यातील सर्व गट नंबर व सर्वे नंबरनिहाय शेत रस्त्यांची नोंद या प्रणालीत करण्यात आली आहे. त्यामुळे शेत रस्त्यांबाबतच्या तक्रारी, नागरिकांचे प्रश्न,तसेच रस्ता उपलब्धतेसाठीचे अर्ज यांचे प्रभावी निराकरण शक्य झाले असून ग्रामीण भागातील विकासाला मोठी चालना मिळत आहे.

यासोबतच ई-ऑफिस प्रणालीचा जास्तीत जास्त वापर केल्यामुळे पेपरलेस कार्यालय ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असून, शासकीय कामकाजाचा निपटारा जलद व पारदर्शक पद्धतीने होत आहे.या सर्व उपक्रमांचा थेट लाभ जिल्ह्यातील नागरिकांना मिळत असून,सेवा वितरण अधिक सुलभ, जलद व विश्वासार्ह झाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल राज्यभरातून कौतुक होत असून पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांचा सत्कार करून जिल्हा प्रशासनाच्या कार्याचे विशेष कौतुक केले.भविष्यात धाराशिव जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी प्रयत्न करण्याच्या शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी श्री.विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्री.शिरीष यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्री. प्रविण धरमकर,उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प क्र. २) श्री.संतोष राऊत,उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) श्रीमती अरुणा गायकवाड, उपजिल्हाधिकारी (मांजरा प्रकल्प) श्री.श्रीकांत पाटील,सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भूम श्री.रेवैयाह डोंगरे (भा.प्र.से.), उपविभागीय अधिकारी धाराशिव श्री.ओंकार देशमुख, उमरगा श्री.दत्तू शेवाळे,कळंब श्री. गणेश शिंदे,सर्व तालुका तहसीलदार, महसूल तहसीलदार श्री.प्रकाश व्हटकर,सर्व नायब तहसीलदार, जिल्हा सूचना व विज्ञान केंद्र अधिकारी श्री.अंकीत सिंग,सीएम फेलो श्री.मनोज नाईकवाडी, श्री.रणधिरसिंह भोसले,जीआयओ श्री.विश्वजीत साखरे,जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक श्री.तानाजी हंगरगेकर, सीनियर नेटवर्क इंजिनियर श्री.बंडू गाडे,श्री.अमोल कांबळे तसेच जिल्ह्यातील सर्व सहायक महसूल अधिकारी,महसूल सहायक,मंडळ अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी ते महसूल सेवक यांनी या यशासाठी सांघिक प्रयत्न केले.

या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या योगदानाबद्दल जिल्हाधिकारी श्री. कीर्ती किरण पुजार यांनी विशेष कौतुक केले.तसेच प्रशासनात Artificial Intelligence (AI) सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आल्याचे नमूद करून नागरिकांनी या सर्व डिजिटल सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी केले. १५० दिवसांचा हा उपक्रम धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरत असून,भविष्यात जिल्ह्याच्या प्रगतीला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

# रस्ता सुरक्षा अभियान २०२६: अवयवदान जनजागृती 'अवयवदान हे महादान'चा संदेश



धाराशिव (जिमाका) -रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने दि.०१ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले. त्याच अनुषंगाने आज २७ जानेवारी २०२६ रोजी आरोग्य विभागाच्या सहकार्याने अवयवदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव येथे जिल्हा शल्य चिकित्सक,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने वाहन चालक व मालक, मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे चालक, कार्यालयात आलेले शिकाऊ व पक्के लायसन उमेदवार तसेच सर्व नागरिकांसाठी अवयवदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.प्रशांतराव साळी यांनी उपस्थित उमेदवार व नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येतो.या अभियानाचा मुख्य उद्देश अपघातांचे प्रमाण कमी करणे त्यासाठी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करणे हा आहे.जिल्ह्यातही विविध ठिकाणी असे कार्यक्रम घेऊन नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे.

रक्तदानाप्रमाणेच अवयवदानासाठीही नागरिकांनी पुढे यावे,असे आवाहन त्यांनी केले. श्री.साळी यांनी पुढे सांगितले की, अपघातातील व्यक्तींच्या अवयवदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो.अपघातग्रस्त व्यक्तींच्या नातेवाईकांनी अवयवदानाचे महत्त्व समजून घ्यावे व त्यासाठी सहकार्य करावे,असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय येथील डॉ.विक्रम राठोड, डॉ. शिवाजी फुलारे व डॉ.अर्चना गुट्टे यांनी अवयवदानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अवयवदान हे महादान असून जीवनापलीकडचे वरदान आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे हृदय,यकृत,मूत्रपिंड (किडनी), फुफ्फुस, स्वादुपिंड,त्वचा,डोळे,हाडे आदी अवयव गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी देणे हा माणसाने करू शकणारा सर्वात निस्वार्थ व थोर उपकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. योग्य अवयव न मिळाल्यामुळे दरवर्षी हजारो लोक मृत्युमुखी पडतात,तर अनेक रुग्ण अवयवांच्या प्रतीक्षेत वेदनादायी जीवन जगतात. नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना नवीन दृष्टी मिळू शकते.अवयवदानासाठी वय ही अट नसून अवयवांची गुणवत्ता महत्त्वाची असल्याचेही त्यांनी सांगितले. अवयवदानासाठी NOTTO (National Organ and Tissue Transplant Organization) यांच्या संकेतस्थळावर किंवा स्थानिक रुग्णालयात ऑर्गन डोनर कार्डसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.सर्व नागरिकांनी अवयवदाता बनण्याचा संकल्प करून अवयवदान म्हणजेच जीवनदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक श्री.अनिल खेमनार, श्रीमती पूनम पोळ,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.कुणाल होले, श्री.महेबूब मुसा सय्यद,श्री.वाघ, अधिक्षक श्री.डी. के.लोंढे,श्री.नरसिंह कुलकर्णी,श्री.ए.आर. राऊत, श्री.बालाजी वाघमारे,श्री.रमेश कऱ्हाळे,श्रीमती संध्या राणी गवाड, करिष्मा लोहार तसेच शिपाई श्री. दत्तू सरपे,श्री. एस.जी.काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री. कुणाल होले यांनी आभार प्रदर्शन केले.




# काम बोलतंय, आरोप गप्प बसतात!

## अर्चनाताई पाटील यांचा 'तेर' गटातून विजयाचा निर्धार - निवडणुकीत बाजी मारणार हे निश्चित!

**धाराशिव( रामेश्वर डोंगरे )** जिल्हा परिषद निवडणुकीत आमदार राणादादा पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांना 'ते र' गटातून उमेदवारी मिळाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. उमेदवारी जाहीर होताच टीका, आरोप आणि राजकीय डावपेच सुरू झाले असले, तरी अर्चनाताई पाटील यांनी कोणत्याही वादात न अडकता थेट कामाच्या जोरावर निवडणूक लढवण्याचा ठाम निर्धार केला आहे.

अर्चनाताई पाटील या केवळ आमदारांच्या पत्नी म्हणून नव्हे, तर स्वतःच्या कर्तृत्वावर उभ्या राहिलेल्या सक्षम महिला नेत्या म्हणून ओळखल्या जातात. सामाजिक, राजकीय आणि जनहिताच्या कामात सातत्याने सक्रिय राहिल्यामुळे त्या सामान्य कार्यकर्त्यांपासून मतदारांपर्यंत विश्वासार्ह चेहरा बनल्या आहेत. त्यांचे काम इतके ठळक आहे की त्यांना स्वतः बोलण्याची गरज भासत नाही - त्यांचे कामच त्यांच्या विजयाची हमी देते. राजकीय विरोधकांकडून उमेदवारीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असले, तरी कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण आहे. ज्याचं काम दिसतं, त्यालाच मत मिळतं हे गणित या निवडणुकीत अर्चनाताई पाटील यांच्या बाबतीत पक्कं होताना दिसत आहे. गावागावातील जनतेचा सकारात्मक प्रतिसाद, कार्यकर्त्यांची भक्कम फळी आणि नेतृत्वाचा ठाम पाठिंबा यामुळे त्यांचा विजय अटळ मानला जात आहे.

विशेष म्हणजे, राजकीय गदारोळ, आरोप-प्रत्यारोप आणि विरोधकांचे डावपेच याकडे दुर्लक्ष करून अर्चनाताई पाटील यांनी विकास, विश्वास आणि सातत्य यालाच आपला अजेंडा ठेवला आहे. कामावर विश्वास ठेवून निवडणूक जिंकायची हीच त्यांची भूमिका असून, त्यामुळेच अर्चनाताई पाटील निवडणूक जिंकणार हे आज राजकीय वर्तुळात शंभर टक्के सत्य म्हणून बोलले जात आहे.

एकंदरीत, या निवडणुकीत भाषणांपेक्षा काम भारी ठरणार असून, अर्चनाताई पाटील यांचा विजय केवळ शक्यता नाही, तर निश्चित वास्तव ठरणार असे चित्र सध्या स्पष्टपणे दिसत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# जनता विचारी बनली पाहिजे..

आपल्या देशात आलिकडे नको त्या बाबीवर विचार व चिंतन होत आहे. राजकारण व समाजकारण या भिन्न बाबी नाहीत. राजकारणातून समाजहीत जोपासता येते हे विसरून चालणार नाही. राजकारण ही एक समाजकारणासाठी जनतेनी मिळवुन दिलेली संधी आहे. त्या संधीचे सोने केले पाहिजे. केवळ काही ही करून निवडणुका जिंकायाच्या नंतर सर्व काही विसरून जायचे. दिलेले आश्वासने विसरून चालायाचे हे योग्य नाही. अल्पावधित नगरपाहिलेकेची निवडणुकानंतर महानगरपालिकेच्या झाल्या. आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुक प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे राज्यातील जवळपास जिप सोडून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. आता जनतेची कामे होणे अपेक्षित आहे. जनतेला दिलेली आश्वासने पाळण्याची वेळ आली आहे. असे जरी असले तरी अविचाराने काही राज्यात ज्या घटना घडल्या आहेत त्यावर राजकारण अधिक होताना दिसून येत आहे. राज्यात दोन घटना घडल्या एक मुंबई ही हिरवी करण्यात येणार असे नुतन नगरसेविकेचे मत जाहिर झाले तर ना. महाजन यांच्यावर आरोप होत आहेत. मुळात राष्ट्रपुरूषाचे नाव घेतले नाही म्हणजे त्यांचे विचार, त्यांनी दाखविलेला मार्ग, त्यांचा त्याग कदापी कोणीही विसरणार नाही. उत्तुंग उंचेचे माणसे असतात त्यांची उंची कदापी कमी होत नाही. राज्यात काही बाबीला अधिक महत्त्व देवून उलट प्रसिद्धी दिली जात आहे. देशातील जनतेनी विचार करावा की, सध्याला प्रत्येकजन हा स्वावलंबी बनला पाहिजे. अमेरिका वरचेवर दम भरत आहे. कोरडा असला तरी त्याची प्रत्यक्षात आमलबजावणी होवू शकते. त्यामुळे भारतीय मंडळी दिर्घकाळ विचार करीत नाहीत. तात्पुरता विचार करीत असतात. नको त्या बाबीला महत्त्व देत आहेत. भारतीय युवक हा बलशाली बनला पाहिजे या बाबत चिंतन झाले पाहिजे. युवकांच्या हाती काम नाही, दिल्यास अनर्थ होवू शकतो.हे चुकीचे आहे. देशात काही बाबीची गरज नाही. जशी मद्याची गरज नाही. त्यापेक्षा दुधाचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. गायी किंवा म्हैसची पालनास प्रोहत्सान दिले पाहिजे. मत्स्य किंवा कोंबडी पालन, किंवा सुवर पालन हे मुळात पालन नाही तर त्या कापून खाण्यासाठी पालन करण्याचा मार्ग आहे. पालन नाही मारण्यासाठी पालन केंद्र दिसून येतात आहे. हा हिंसेचा मार्ग आहे. टेम्पोच्या टेंम्पो कोंबडी कापण्यासाठी येतात, त्या खाण्यासाठी असतात. त्यापेक्षा इतर खाद्य मानवासाठी पोषक आहेत. मुळात मानवाचे खाद्य हे मांसाहार नाही. मांसाहर हा ताकदीचा पदार्थ नाही. सर्वात बलवान हत्ती आहे. चपळ, वेगवान हा घोडा आहे. सहज या झाडावरून त्या झाडावर उड्या मारणारे माकड आहे यांचा आहार कसा आहे. या सर्वांचा आहार हा शाखाहार आहे. सिंह, वाघ हे प्राणी भित्रे आहेत. ते संकटाचा मुकाबला करण्यात असर्थ ठरतात. त्यामुळे शाकाहार हा सर्वोत्तम आहे या बाबत जागृती होत नाही. उलट काही प्राण्याचे पालन करा, अनुदान, मदत घ्या ती कशासाठी हिंसा घडविण्यासाठी! एखाद्या प्राण्यास कापणे म्हणजे हिंसा घडविणे नव्हे काय? मुळात काही चांगल्या बाबीचा भारतीय विचार करीत नाहीत. तो केला पाहिजे. त्यामुळे नको त्या बाबीत आपली ताकद खर्च केली जाते हे मोठे दुर्दैव आहे. भारतीय हुशार असले तरी योग्य मार्ग दाखविणारे कमी आहेत. त्यामुळे अयोग्य मार्ग निवडला जात आहे. मुळात देश स्वतंत्र झाल्यापासून महापुरूषांची कमतरता दिसून येते. स्वातंत्र्यपुर्व काळात अनेक महापुरूष जन्माले आहे. महाराष्ट्रात तर महात्मे, योगीपुरूषा बरोबर स्वातंत्र्य वीर जन्माले. छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिकळ असे असंख्य शेकडोंच्या संख्येने महापुरूष जन्माले आले. स्वातंत्र्यानंतर जन्माले का आले नाहीत. मातेनी जन्माला का घातले नाहीत हा संशोधनाचा विषय आहे. स्वातंत्र्यापुर्वी देशभक्त जन्माला येत. नंतर आले नाही हे सहज दिसून येत आहे. देशाला स्वराज्य मिळाले मात्र सुराज्य करणारे कसे जन्माला आले नाहीत. याबाबत विचार होणे अपेक्षित आहे. मुळात भारतात विचारी मंडळीचा अभाव वरचेवर जाणवत आहे. संकुचित वृत्ती वाढीस लागत आहे. स्वस्वार्थपना वाढला आहे. देशहीत असो किंवा राष्ट्रीय मालमत्तेची जोपासना करणाऱ्यांची संख्या कमी होताना दिसून येत आहे. ही बाब अतिषय चिंताजनक दिसून येते. अमेरिकेचे ट्रॅम्प सतत आर्थिक कोंडी करण्याचा वल्गना करीत आहेत. किती दिवस भारतीय मंडळी घाबरून वागायाचे या बाबत विचार करणे काळाची गरज आहे. राज्यात तसे पाहिले तर अन्नधान्याची कमतरता नाही. मोठे संकट नाही. असे असताना सुखी व समाधानाची जी धडपड दिसून येते ती विचार करायाला लावणारी आहे. त्यामुळे भारतीयांनी विचार करून बलशाली बनण्याचा प्रयत्न जोमाने केला पाहिजे. भारतीयांनी एकजुटपने निर्णय घेतला तर अनेक समस्या सोडविता येतील. सध्याला काही अंतर्गत बाबी ज्या घडत आहेत. चुकीच्या बाबी घडत आहे. नको त्या बाबीला प्रसिद्धी मिळत आहे. राष्ट्रप्रेम कमी होताना दिसून येत आहे. कोणीही लोकशाहीच्या आधारे चुकीचे बोलाणे योग्य नाही. हिरवेकरण करणे असे जाहिर बोलणे किती धाडसाचे काम आहे. हे धाडस कसे निर्माण होते. त्यांच्या पाठीसी वेगळी विघातक शक्तीमुळे असे देशविरोधी बोलण्याचे धाडस निर्माण होते. हे लक्षात कसे येत नाही. मुळात राष्ट्र मजबुत असेल तर कोणालाही देशविरोधी बोलण्याचे धाडस होवू शकत नाही. कोणीही देशविरोधात बोलले जात असेल तर ते खपवुन घेवू नये. असे वक्तव्य इतर कोणी केले असते तर त्याला जिवंत ठेवणार नाही असे वक्तव्य केले असते. मुळात स्वातंत्र्यांनतर राष्ट्रप्रेम कमी झाले आहे हे उघड आहे. पुन्हा राष्ट्रपुरूष सत्तरवर्षात जन्माला आले नाहीत हेही उघड दिसून येत आहे. मुळात आता इतरांकोणी सांगण्यापेक्षा प्रत्येक देशातील नागरिकांनी विचार करून वागले पाहिजे. प्रत्येकांनी आपली राष्ट्रभक्ती कार्यातून दाखविण्याची वेळ आली आहे. त्यासाठी देशातील नागरिकांनी स्वत: सक्षम बनले पाहिजे.

# काय अजूबा झाला विठ्ठल : शिवात विठ्ठल, विठ्ठलात शिव पाहिला

भक्ती म्हणजे केवळ नामस्मरण नव्हे तर आपल्या कर्तव्यातच ईश्वराचा शोध घेणे म्हणजे खरी भक्ती. पंढरीच्या विठू रायाचे निस्सीम भक्त असूनही आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून अध्यात्माची उंच शिखरे गाठणारे संत शिरोमणी म्हणजे, '' संत नरहरी सोनार ''.! यांचा जीवन प्रवास म्हणजे भक्ती आणि कर्माचा सुंदर संगम आहे. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांचा ७४० वा समाधी सोहळा आहे. त्यानिमित्ताने हा लेख..

भारतीय अध्यात्म परंपरेत शैव आणि विष्णू हे दोन प्रवाह प्रदीर्घ काळापासून समांतर वहात होते. या दोन उपासकामध्ये वादही होत. पण तेराव्या शतकात पंढरीच्या वाळवंटात अशा एका महान संतांचा उदय झाला. ज्याने आपल्या कलेतून आणि भक्तीतून हे सिद्ध केले की, '' हरि आणि हर '' ( विष्णू आणि शिव ) यामध्ये कोणताही भेद नाही ते संत शिरोमणी नरहरी महाराज होय. कट्टर शिव भक्ती आणि विठ्ठल भेटीचा प्रसंग -- पंढरपूरात राहूनही नरहरी महाराज कधीही विठ्ठलाच्या मंदिरात जात नसत. ते अत्यंत कट्टर शिवभक्त होते. एकदा एका सावकाराने विठ्ठलाला सोन्याचा कंबरपट्टा अर्पण करण्याचा नवस केला. त्याचे माप घेण्यासाठी नरहरी महाराजांना विनंती केली. नरहरी महाराजांनी मंदिरात जाण्यास नकार दिला. पण शेवटी स्वतःच्या डोळ्यावर पट्टी बांधून ते मूर्तिचे माप घेण्यासाठी मंदिरात गेले.

काय अजूबा झाला विठ्ठल --- जेंव्हा महाराजांनी डोळ्यावर पट्टी बांधलेल्या स्थितीत विठ्ठल मूर्तीला स्पर्श केला तेंव्हा त्यांना हाताला व्याघ्रचर्म, गळ्यात सर्प आणि डोक्यावर जटांचा स्पर्श झाला. त्यांना वाटले ही तर आपल्या शिवाचे रूप आहे. पण पट्टी काढून पाहिले तर समोर विठ्ठल उभा होता. पुन्हा पट्टी बांधली की, पुन्हा शिवाचा भास ! या विलक्षण अनुभवातून त्यांना साक्षात्कार झाला की, '' शिव आणि विष्णू एकची प्रतिमा, दोघेही एकाचे स्वरूप हाच तो ''अजूबा '' होता. जिथे शिवात विठ्ठल आणि विठ्ठलात शिव एकरूप झाले होते. या घटने नंतर नरहरी महाराजांनी भेदाची भिंत पाडली आणि ते वारकरी संप्रदायाचे अनन्य भक्त झाले. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी संत नरहरी महाराजांचा ७४० वा समाधी सोहळा साजरा होत आहे. त्यांनी पंढरपूर येथे शके १२३५ ( इ. स. १३१३ ) मध्ये समाधी घेतली. त्यांच्या जीवनातून आपल्याला कांही महत्वाचे धडे मिळतात. १ अद्वैत विचार -- देव एकच आहे, फक्त त्याची रूपे भिन्न आहेत. २ कष्टातून भक्ती -- देवा तुझा मी सोनार, तुझे नाम आम्हां सार असे म्हणत त्यांनी आपल्या व्यवसायात विठ्ठल पाहिला. ३ अहंकाराचा त्याग --- विठ्ठलाच्या भेटीने त्यांचा भेदांचा अहंकार नष्ट झाला. संत नरहरी महाराजांची ही कथा केवळ एका चमत्काराची कथा नसून मानवी मनातून संकुचित विचार आणि वृत्ती नष्ट करण्याची कथा आहे. आज ७४० वर्षा नंतर ही, '' हरि हर '' ऐक्याचा संदेश तितकाच प्रेरणादायी आहे. काय अजूबा झाला विठ्ठल हा अनुभव केवळ संत नरहरी महाराजांचा नसून तो प्रत्येक भक्ताला एकात्मतेची शिकवण देणारा प्रकाश आहे. आज ४ फेब्रुवारी २०२६ रोजी आपण आपल्या आराध्य दैवताचा , संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा समाधी सोहळा साजरा करत आहोत. देवा तुझा मी सोनार असे म्हणत व्यवसायालाच भक्ती बनवणाऱ्या महाराजांचा वारसा आपण पुढे चालवत आहोत. या मंगल दिनी आपण समाजासाठी कांही महत्वाचे संकल्प करू या.

१ व्यवसायात सचोटी आणि कौशल्य --- नरहरी महाराजांनी सोन्याचे दागिने घडवताना त्यात कधीही खोटेपणा केला नाही. आजच्या काळातही सोनार समाजाने आपल्या व्यवसायात शुद्धता आणि विश्वास हीच आपली खरी ओळख राखली पाहिजे. तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन डिझाईन्स आणि आधुनिक कौशल्याची कास धरून आपला पिढीजात व्यवसाय जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प आपण केला पाहिजे.

२ हरिहर ऐक्याचा विचार --- संत नरहरी महाराजांनी शिव आणि विष्णू यांच्यातील भेद मिटविला याच न्यायाने आपणही समाजातील पोटजाती, गट तट बाजूला सारून एकसंघ सोनार समाज म्हणून एकत्र येणे काळाची गरज आहे. समाजात एकोपा असेल तरच आपण आपली प्रगती साधू शकतो.

३ शिक्षणाद्वारे प्रगती -- केवळ व्यवसायात अडकून न राहता समाजातील तरुण पिढीने उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि उद्योग क्षेत्रात मोठी झेप घ्यावी. महाराजांची बुद्धिमत्ता आणि कला जशी श्रेष्ठ होती तशीच प्रज्ञा आजच्या पिढीने ज्ञानाच्या जोरावर सिद्ध करावी.

४ सामाजिक बांधिलकी --- आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या बांधवाना मदत करणे, समाजातील कर्तृत्वान आणि गुणी जनांचा, गुणवंत विध्यार्थ्यांचा सन्मान करणे आणि एकमेकांच्या सुख दुःखात धावून जाणे हीच महाराजांची खरी सेवा ठरेल. आपल्या कलेचा आणि संपत्तीचा कांही अंश समाजाच्या हितासाठी खर्च करण्याचा वसा आपण घेतला पाहिजे.



५ व्यसनमुक्ती आणि संस्कार --- महाराजांचे जीवन अत्यंत सात्विक आणि भक्तिमय होते. आजच्या तरुणाईला व्यसनापासून दूर ठेऊन त्यांना अध्यात्माची आणि नीतिमत्तेची जोड देणे आवश्यक आहे . थोडक्यात संत नरहरी महाराजांचे ७४० वे समाधी वर्षं हे केवळ उत्सवाचे वर्षं नसून ते आत्मचिंतनाचे वर्षं आहे. आपण सारे केवळ त्यांचे नांव सांगणारे न होता त्यांच्या सारखे शुद्ध आचरण करणारे व्हावे. ज्याप्रमाणे अग्नीत तावून सुलाखून निघाल्यावर सोन्याला चकाकी येते. तशाच कष्टाने आणि प्रामाणिक पणाने आपण आपल्या समाजाची चकाकी जगभर पसरवू या. संत नरहरी महाराजांनी जसा सोन्याला आकार देऊन सुंदर अलंकार घडवले. तसेच आजच्या युगात सोनार समाजातील तरुणांच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले आहे. ७४० व्या समाधी सोहळ्याचे औचित्य साधून या महामंडळाचा लाभ घेणे हीच खरी प्रगती आणि आर्थिक क्रांतीचे पाऊल ठरेल. या महामंडळाच्या माध्यमातून समाजातील तरुणांना उद्योजकतेची संधी मिळेल . तसेच समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. पारंपारिक सुवर्ण व्यवसायाला आधुनिकतेची जोड देण्यासाठी किंवा नवीन उद्योग सुरु करण्यासाठी हे महामंडळ एक भक्कम आधार आहे.

कौशल्य विकास -- केवळ कर्ज च नव्हे तर दागिन्याचे डिझाईनिंग, मार्केटिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी महामंडळाने पुढाकार घेतला पाहिजे. जेणेकरून आपला समाज जागतिक बाजार पेठेत स्पर्श करू शकेल.

महिला सक्षमीकरण -- समाजातील महिला बचत गटांना आणि महिला उद्योजकांना या महामंडळाच्या योजनातून बळ मिळणे आवश्यक आहे. व्यवसायात महिलांचा सहभाग वाढल्यास समाजाचा आर्थिक स्तर उंचावेल.

पारदर्शकता आणि जागृती --समाधी सोहळ्यानिमित्त प्रत्येक शहरात, तालुक्यात या महामंडळाच्या योजनान्ची माहिती पोहोचविणे गरजेचे आहे. शासनाच्या या उपक्रमाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी संत नरहरी महाराजांच्या नावाखाली चालणाऱ्या संस्था, मंडळे आणि संघटनानी, समाजातील नेते, कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन पुढाकार घ्यावा. ज्याप्रमाणे संत नरहरी महाराजांनी विठ्ठलाच्या चरणी आपली भक्ती अर्पण केली त्याच प्रमाणे आपण आपली मेहनत आणि शासनाच्या या योजनांची जोड देऊन समाजाला आर्थिक दृष्ट्या समृद्ध करू या ! संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ हे आपल्या प्रगतीचे एक महत्वाचे साधन आहे. त्याचा सुज्ञ पणे वापर करणे हेच या समाधी सोहळ्याचे सार्थक ठरेल.

सोलापूर च्या सोनार समाज संस्थेने आदर्श कृतीतून साकारली संत नरहरी महाराजांची सेवा --

संत नरहरी महाराजांचा ७४० वा समाधी सोहळा आपण साजरा करत असताना केवळ उत्सव न करता समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी काय करावे याचा एक उत्तम वस्तूपाठ सोलापूरच्या सोनार समाज संस्थेने घालून दिला आहे. २८ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर येथे संपन्न झालेले, '' शासकीय योजना माहिती शिबीर '' हे समाजाच्या आर्थिक क्रांतीचे पहिले पाऊल ठरले आहे. या शिबिरात साधारणतः पाचसे समाज बांधवानी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला हे अत्यंत आशादायी आहे.या शिबिराचे महत्व आणि फलश्रुती म्हणजे अधिकारी आणि सोनार, सुवर्णकार बांधव यांचा थेट संवाद. या शिबिरात केवळ पत्रके वाटली नाहीत तर सर्व संबंधित खात्याचे अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या शिबिरात बहूआयामी योजनांची माहिती दिली गेली, जसे की, संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ --- समाजासाठी विशेष असलेल्या या महामंडळा च्या कर्जाचा आणि इतर सवालतीच्या योजनांची सखोल माहिती पोहोचवली गेली. विश्वकर्मा कौशल्य विकास योजना --- सोनार समाजाच्या पिढीजात सुवर्ण कलेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड कशी द्यावी याचे मार्गदर्शन यातून मिळाले. पंतप्रधान व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना -- उद्योजक बनू इच्छिणाऱ्या तरुणासाठी भाग भांडवल जसे उभे करावे यावर प्रकाश टाकला गेला. सोलापूर च्या या उपक्रमाची सर्वत्र दखल घेऊन शासकीय योजना शिबिराचे राज्यभरातून कौतुक होत आहे. सोलापूर ने दाखवलेला हा मार्ग संपूर्ण राज्यासाठी दिपस्तंभ ठरत आहे. या कार्याची दखल घेत दैनिक शिवनातीर चे संपादक श्री. मधुकर महाले ( छ. संभाजीनगर ), दैनिक लातूर समाचार चे संपादक श्री. विवेकानंद जडे ( लातूर ), दैनिक शिव निर्णय चे संपादक श्री अनील शिराळकर ( सोलापूर ), यांच्या सारख्या जेष्ठ संपादकांनी तसेच श्री. अजीत पोतदार वशीकर मिरज, प्रकाश पोतदार सांगली, सुनील वेदपाठक, सुरेश पंडित कोल्हापूर, भारत कारीकर सोलापूर , संजय आष्टीकर आष्टी, प्रमोद वेदपाठक माढा , सुभाषदादा वेदपाठक मोडनिंब , यांचे सारखे उद्योजक आणि श्री. सुरेश महामुनी, प्रकाश तपासे, सोलापूर, राजाभाऊ मैदर्गीकर, प्रमोद पाचणकर, सुभाष घोडके, पुणे, जगन्नाथ धर्माधिकारी मसूर - कराड, शिवाजीराव महामुनी बीड, साहित्यिक कृष्णकांत लोणे अहिल्यानगर, संजय शंकूरवार हदगांव नांदेड, डॉ. विनोद वेदपाठक अंबाजोगाई, डॉ. ज्ञानेश्वर पंडित विजयपूर, यासारख्या समाज धुरीणांनी सोलापूर च्या उपक्रमाचा गौरव केला आहे. तरी सर्व सोनार समाज बांधवाना आवाहन करण्यात येते की, सोलापूर मध्ये जो उपक्रम राबवला गेला, तशाच स्वरूपाची शिबीरे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नरहरी महाराजांचे नांवे असलेल्या संस्था नी आयोजित केली पाहिजेत. संत नरहरी महाराजांनी जसे भक्ती आणि कर्माचा मेळ घातला, तसेच आपण भक्ती आणि शासकीय योजनांची माहिती यांचा मेळ घालून समाजाची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. ज्या समाज बांधवानी सोलापूर च्या शिबिराचा लाभ घेतला त्यांनी आता या योजनेचे प्रत्येक्ष लाभ घेऊन आपल्या उद्योगाची भरभराट करून स्वतःची प्रगती साधावी हीच संत नरहरी महाराजांच्या चरणी अर्पण केलेली खरी कार्यांजली ठरेल.

**– वसंत पोतदार, सोलापूर ---**
**मोबाईल ९४२३० ६५९१५**

# एका धडाडीच्या पर्वाचा करुण अंत; उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार: शब्दाचा पक्का



बारामतीच्या मातीत विसावलेली महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवारांची अखेरची झेप एका झंझावाती नेतृत्वाचा शेवट करून गेली. पहाटेपासून कामाला लागणारा रिझल्ट ओरिएंटेड नेता, तिजोरीवर वित्तीय शिस्त लावणारा अर्थमंत्री आणि शब्दाचा पक्का दादामाणूस म्हणून त्यांनी उमटवलेला ठसा कधीही पुसता येणार नाही. त्यांच्या जाण्याने प्रशासकीय वज्रमूठ आणि विकासाचा पहाडी आवाज कायमचा शांत झाला आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली!**

२८ जानेवारी २०२६ ची ती सकाळ महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात एका भीषण आघाताची नोंद करून गेली. बारामती विमानतळावर धावपट्टीच्या अगदी जवळ, सकाळी ८ वाजून ४८ मिनिटांनी या क्रमांकाचे लिअरजेट ४५ विमान कोसळले आणि क्षणात आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या भीषण अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित अनंतराव पवार ऊर्फ दादा यांचे निधन झाले. ज्या मातीने त्यांना घडवले, ज्या बारामतीला त्यांनी जागतिक नकाशावर नेले, त्याच मातीत त्यांच्या आयुष्याची अखेरची विमानझेप विसावली.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार यांच्या जाण्याने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एका संस्थेचा अंत झाला आहे. व्यक्तीपेक्षा अधिक प्रभावी ठरणारे त्यांचे नेतृत्व, प्रशासनावर असलेली वज्रमुठ आणि शब्दाची पक्की विश्वासार्हता ही त्यांची ओळख आता केवळ स्मृतींच्या कप्प्यात उरली आहे.

**प्रशासकीय शिस्तीचा नंदीग्राम**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार म्हणजे केवळ एक नाव नव्हते, तर ती गतीमान प्रशासनाची एक ब्रँड होती. सकाळी साडेसहा-सात वाजता पुण्याच्या वा राज्याच्या कानाकोपऱ्यात जेव्हा एखादा प्रोजेक्ट तपासण्यासाठी दादा हजर असायचे, तेव्हा ते फक्त अधिकारीच नव्हे, तर पत्रकारांनाही घड्याळाच्या काट्यावर चालवायचे. अजितदादांच्या राजकीय प्रवासात वक्तशीरपणा हा त्यांचा सर्वात मोठा दागिना होता.

अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या तिजोरीवर जी वित्तीय शिस्त लावली, ती अभूतपूर्व होती. ''जे काम होऊ शकते ते होईल आणि जे होणार नाही ते स्पष्टपणे तोंडावर सांगण्याची निर्भीडता'' हे त्यांच्या नेतृत्वाचे गमक होते. लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना श्रद्धांजली वाहताना म्हटल्याप्रमाणे, ''प्रशासनावरील त्यांची पकड इतकी मजबूत होती की, मंत्रालयातील फाईल्सना गती देण्यासाठी दादांचा एक फोन पुरेसा असायचा.''

**१९९१ ते २०२६: बारामती ते राज्यव्यापी झेप**

२२ जुलै १९५९ रोजी अहमदनगरच्या देवळाली प्रवरा येथे जन्मलेल्या अजितदादांचा राजकीय प्रवास १९८२ मध्ये सहकारी संस्थांमधून सुरू झाला. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामतीतून लोकसभेवर गेले, पण काका शरद पवार यांच्यासाठी त्यांनी ती जागा आनंदाने सोडून दिली. तिथून सुरू झालेली त्यांची ही वाटचाल सलग सातवेळा आमदार आणि तब्बल पाच वेळा उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचली.

त्यांचा राजकीय प्रवास हा वारशातून मिळालेला असला, तरी तो टिकवणे आणि वाढवणे हे त्यांच्या स्वतःच्या कष्टाचे फळ होते. पुणे जिल्हा बँकेपासून ते राज्याच्या अर्थमंत्रालयापर्यंत त्यांनी सत्तेचा वापर हा कामासाठी केला. पिंपरी-चिंचवड शहराचा झालेला कायापालट हे त्यांच्या कामाच्या धडाडीचे जिवंत स्मारक आहे.

**वाद, विरोध आणि वास्तववादी नेता**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवारांचे व्यक्तिमत्त्व वादांपासून कधीच अलिप्त राहिले नाही. मग ते सिंचन घोटाळ्याचे आरोप असोत किंवा त्यांची काही वादग्रस्त विधाने; पण दादांनी नेहमीच ताकाला जाऊन भांडं लपवणे हा प्रकार केला नाही. त्यांनी चुकांची किंमत मोजली आणि पुन्हा फिनिक्स पक्षासारखी झेपही घेतली.

२०१९ चा तो पहाटेचा शपथविधी असो वा २०२३ मध्ये शरद पवारांपासून वेगळे होऊन सत्तेत सामील होण्याचा निर्णय; अजितदादांच्या राजकारणामागे सत्ता मिळवण्यापेक्षा काम करण्याची संधी मिळवणे हेच मुख्य सूत्र होते. भाजपसोबत गेल्यावर त्यांनी आपली प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला, गुलाबी जॅकेट घातले, पण त्यांच्या स्वभावातील रोखठोकपणा कधीच बदलला नाही. राजकीय समीकरणांच्या पलीकडे जाऊन त्यांनी रिझल्ट ओरिएंटेड नेता ही आपली प्रतिमा अधिक ठळक केली.

**शेतकरी, पाणी आणि विकास: एक अतूट त्रिसूत्री**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजितदादांच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी नेहमीच ग्रामीण महाराष्ट्र राहिला. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन या विषयांत त्यांना असलेली गती आणि रस वाखाणण्याजोगा होता. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रकल्प मार्गी लावले. ''बस वा वाहने गरागरागरा फिरत...'' अशा शैलीत रिंग रोडचे महत्त्व पटवून देणारे दादा हे आधुनिक विकासाचे पुरस्कर्ते होते. शेतकरी पुत्राचे दुःख त्यांना ठाऊक होते, म्हणूनच अर्थसंकल्प मांडताना त्यांनी नेहमीच कृषी क्षेत्राला झुकते माप दिले.

**सहृदयी दादामाणूस आणि कौटुंबिक दुःख**

कठोर प्रशासकाच्या पडद्याआड एक संवेदनशील माणूस दडलेला होता. दिलीप वळसे पाटलांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी स्वतः रुग्णालयात बसून फोन उचलणारे अजित पवार असोत, किंवा चित्रातले आपले ध्यान पाहून त्यावर मिश्किल टिप्पणी करणारे दादा असोत; त्यांचे हे रूप लोभस होते.

आज त्यांच्या निधनाने शरद पवार आणि प्रतिभा पवार यांच्यावर वयाच्या या टप्प्यावर दुःखाचा जो डोंगर कोसळला आहे, त्याची कल्पनाही करवत नाही. अजितदादांच्या आई आशा पवार यांच्यासाठी तर ही हानी कधीही न भरून येणारी आहे. एका बाजूला राजकीय संघर्ष असले तरी, पवार कुटुंबातील हे बंध या दुःखाच्या प्रसंगी पुन्हा एकदा हेलावून टाकणारे ठरले आहेत.

**वारसा आणि शेवटची वाटचाल**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार गेल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती कधीच भरून निघणार नाही. आज असा नेता मिळणे कठीण आहे, जो सकाळी ६ वाजता कामाला लागतो आणि रात्री १२ वाजेपर्यंत फाईल्सचा निपटारा करतो. त्यांनी पिंपरी-चिंचवड, बारामती आणि पुण्याच्या रूपात जो विकासाचा वारसा ठेवला आहे, तोच त्यांची खरी स्मृती असेल.

मृत्यूने त्यांची वाटचाल थांबवली असली तरी, त्यांनी काळावर उमटवलेला ठसा कधीही पुसता येणार नाही. राजकारणात गॉडफादर नसताना किंवा असलेल्या सावलीतून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणे काय असते, हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

''नेतृत्व माणसाने संपत नाही, ते काळावर ठसा उमटवते.'' अजितदादांच्या रूपाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते कुंड शांत झाले आहे. त्यांच्या निधनाने केवळ एक उपमुख्यमंत्री गेला नाही, तर कामाची भाषा बोलणारा एक पहाडी आवाज निमूट झाला आहे.

दादा आता तुम्ही रिचेबल राहणार नाहीत ही कायम खंत राहील, भावपूर्ण श्रद्धांजली!



**लेखक –**
**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

# दोन्ही बाजूंची गरज

मुक्त व्यापार करारामुळे युरोपात निर्यात करणार्या कंपन्या, व्यावसायिक यांची चार अब्ज युरोपर्यंत बचत होईल, असे सांगण्यात येते. डिजिटल गर्व्हनन्स, हरित ऊर्जा, धोरणात्मक तंत्रज्ञान याचा करारातून भारताला लाभ होईल.

भारत आणि युरोपीय महासंघाने मुक्त व्यापार कराराची घोषणा केली. करारातील बाबींसंदर्भात कायदेशीर आणि तांत्रिक पडताळणी पूर्ण झाल्यावर पुढील वर्षी कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल. तोपर्यंत अर्थातच वातावरण निर्मितीसाठी दोन्ही बाजूंना मदत होईल, असे दिसते! अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या तुघलकी भूमिकेमुळे जागतिक व्यवस्थेला आव्हान मिळाले. रशियाकडून भारत तेलाची आयात वावगे वाटत नाही. फ्रान्सच्या अध्यक्षांनी तो अनुभव घेतला. या पार्श्वभूमीवर 'सर्वांत मोठा करार', असे म्हटल्या गेलेल्या मुक्त व्यापार कराराकडे पाहावे लागेल. युरोपीय युनियनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेन लेयेन आणि युरोपीय व्यापार परिषदेचे अध्यक्ष अँटोनिया कोस्टा यावेळच्या प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या भारत भेटीचे औचित्य साधून कराराची घोषणा झाली. भारत आणि युरोपीय महासंघामध्ये व्यापार युरो या चलनाच्या माध्यमातून होईल. याचा फटका डॉलरला बसेल. अमेरिकेचा यामुळे जळफळाट होणे स्वाभाविक. युरोपीय देश स्वतःविरुद्धच्या युद्धाला मदत करत आहेत, ही अमेरिकेची प्रतिक्रिया आहे! युरोपीय देशांतील मोटार उत्पादक कंपन्यांसाठी भारताची बाजारपेठ महत्त्वाची आहे; पण ११० टक्के आयात शुल्कामुळे भारतीय बाजारपेठेतील अतिश्रीमंत वर्गच त्यांचा ग्राहक होता. आता हे शुल्क आधी चाळीस व नंतर टप्प्याटप्प्याने दहा टक्क्यांपर्यंत कमी होईल. याचा फायदा फोक्सवॅगन, मर्सिडिझ बेंझ वगैरे कंपन्यांना होईल. मुक्त व्यापार करारामुळे भारतीय



करतो, असे कारण पुढे करत आणि यातून रशियाच्या युद्धखोरीला बळ मिळत असल्याचा ठपका ठेवत ट्रम्प यांनी भारतावर जबर आयातशुल्क लादले. कितीही नाकारले तरी ट्रम्प यांच्या निर्णयाचा भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसला आहे. यात भर म्हणजे कमालीची अस्थिर बनलेली जागतिक परिस्थिती. अर्थात, यामध्ये देखील ट्रम्प यांच्या माथेफिरू निर्णयाचीच सक्रिय भूमिका आहे. अशावेळी निर्यातीसाठी अन्य पर्याय शोधण्याशिवाय भारतासमोर पर्याय नव्हता; मात्र यातून युरोपीय महासंघाबरोबर मुक्त व्यापार करार आकाराला आला, असे नव्हे. २००७ मध्ये याबाबत वाटाघाटी सुरू झाल्या होत्या. २०१३ मध्ये चर्चा थांबली. जवळपास एक दशकाच्या खंडानंतर चर्चेला पुन्हा सुरुवात झाली.

रोजगाराला बळ –ब्रिटनबरोबर भारताने यापूर्वीच मुक्त व्यापार करार केला आहे. आता युरोपीय महासंघाचे सदस्य असलेल्या जर्मनी, इटली, फ्रान्स या मुख्य देशांसह महासंघाच्या सर्व २७ देशांबरोबर भारताचा व्यापार वाढेल. युरोपीय महासंघाची बाजारपेठ आणि अमेरिकेची बाजारपेठ याचा आकार साधारण सारखाच आहे. यातून अमेरिकी बाजारपेठेची व्यापकता लक्षात येते; पण आता भारत आणि युरोपीय महासंघाने एकत्र येणे ही दोघांचीही गरज ठरली आहे. 'युरोपकडून आशा' (१९ सप्टेंबर, २०२५) या अग्रलेखात 'केसरी'ने त्याकडे लक्ष वेधले होते. दुसर्या महायुद्धानंतर संरक्षणासाठी युरोपीय देश कायम अमेरिकेवर अवलंबून राहिले. नाटोवर होणार्या अवाढव्य खर्चाचा वारंवार उच्चार, डेन्मार्कचा भाग असलेले ग्रीनलँड ताब्यात घेण्याची भूमिका यामुळे युरोप खडबडून जागा झाला. आतापर्यंत युक्रेनचे युद्ध अमेरिकाच युरोपीय देशांच्या खांद्यावर बंदूक ठेवून लढत होती. तेही ट्रम्प यांना नको आहे. आपल्याच मित्र देशांच्या अध्यक्षांना हिणविण्यात ट्रम्प यांना शेतकरी आणि लघुउद्योगांना युरोपीय बाजारपेठेत प्रवेश सुलभ होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे; मात्र येणारा काळच त्याबद्दल सांगू शकेल. गेल्या आर्थिक वर्षात भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यातील व्यापार १३६ अब्ज डॉलर्स होता. हा व्यापार दुप्पट करण्याचे कराराचे उद्दिष्ट आहे. या करारासोबतच संरक्षणविषयक करारावर देखील स्वाक्षरी झाली आहे. युरोपातील शस्त्र उत्पादक कंपन्यांसाठी भारत प्रमुख आयातदार आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेवा आणि गुंतवणूक यामुळे भारतात रोजगाराला बळ मिळेल. भारतीय अर्थव्यवस्थेला निर्माण झालेला धोका मुक्त व्यापार करारामुळे दूर होईल का? हे येणार्या काही काळात स्पष्ट होईल.

# चाळीसीतही तरुण दिसण्यासाठी काही युक्त्या..

व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता पूर्ण करण्यासाठी आहारात या शाकाहारी पदार्थांचा समावेश करा


या पद्धतीने अक्रोड खाल्ल्याने नसांमधील कोलेस्टेरॉल लोण्यासारखे वितळेल

तुम्हाला वारंवार खाण्याची इच्छा का होते? अन्नाची तीव्र इच्छा नियंत्रित करण्याचे सोपे मार्ग जाणून घ्या

हिवाळ्यात तूप घालून कॉफी पिण्याचे फायदे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे

वयाची चाळीशी ओलांडलीये? मग तुमच्या आहारात 'या' ५ गोष्टी असायलाच हव्या

वय वाढत असताना, आपले चयापचय मंदावते, हार्मोनल बदल वजन, ऊर्जा आणि मूडवर परिणाम करू शकतात आणि हृदयरोग, मधुमेह आणि ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांचा धोका वाढवतात. या पद्धतीने अक्रोड खाल्ल्याने नसांमधील कोलेस्टेरॉल लोण्यासारखे वितळेल. या बदलांदरम्यान योग्य अन्न चयापचय वाढवून, स्नायूंचे वस्तुमान राखून, हार्मोन्स संतुलित करून, हाडे मजबूत करून आणि हृदय आणि मेंदूचे आरोग्य सुधारून शरीराला आधार देऊ शकते. चांगल्या आरोग्यासाठी चाळीशीच्या वयात तुम्ही तुमच्या आहारात हे पदार्थ समाविष्ट करावेत जाणून घेऊ या.



**१. पालेभाज्या**–पालेभाज्या कॅल्शियम, मॅग्नेशियम, फोलेट आणि व्हिटॅमिन के ने समृद्ध असतात, जे हाडांची घनता, हृदयाचे आरोग्य आणि संज्ञानात्मक कार्य सुधारण्यास मदत करतात. ४० वर्षांनंतर हाडांची घनता नैसर्गिकरित्या कमी होते, म्हणून नियमितपणे हिरव्या भाज्या खाल्ल्याने हाडे मजबूत होतात आणि फ्रॅक्चर आणि ऑस्टियोपोरोसिसचा धोका कमी होतो.

**२. फॅटी फिश**

ओमेगा-३ फॅटी अॅसिडने समृद्ध असलेले, फॅटी फिश हृदय आणि मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. ते जळजळ कमी करण्यास, कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास आणि तुमच्या ४० च्या दशकात हार्मोनल बदलांशी संबंधित मूड स्विंग किंवा नैराश्य कमी करण्यास मदत करू शकतात. जास्तीत जास्त फायद्यांसाठी आठवड्यातून किमान दोनदा त्यांचे सेवन करा.

**३. बेरी**

बेरीमध्ये अँटीऑक्सिडंट्स, विशेषतः फ्लेव्होनॉइड्स भरपूर असतात, जे वृद्धत्वाशी संबंधित ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढतात. ते स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यास, त्वचेची लवचिकता सुधारण्यास आणि कर्करोग आणि हृदयरोगासारख्या जुनाट आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करतात, जे मध्यम वयात महत्त्वाचे असतात.

–ङडज ठए–ऊ हे पदार्थ कर्करोगास कारणीभूत आहे, सेवन करणे टाळा

**४. संपूर्ण धान्य**

संपूर्ण धान्ये सतत ऊर्जा प्रदान करतात आणि फायबरमध्ये जास्त असतात, जे पचन सुधारते आणि कोलेस्टेरॉल आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. वजन वाढण्यापासून रोखण्यासाठी आणि मधुमेहाचा धोका कमी करण्यासाठी हे विशेषतः तुमच्या ४० च्या दशकात महत्वाचे आहे.

**५ अॅव्होकॅडो**

अॅव्होकॅडोमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स आणि पोटॅशियम भरपूर असतात. ते खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यास, त्वचेला मॉइश्चरायझ करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यात असलेले निरोगी चरबी व्हिटॅमिन ए, डी, ई आणि के सारख्या चरबी-विरघळणाऱ्या जीवनसत्त्वांचे शोषण करण्यास देखील मदत करतात.

# पोटाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षण

पोटाच्या कर्करोगाची (Stomach Cancer) सुरुवातीची लक्षणे अनेकदा सामान्य वाटू शकतात, ज्यात अपचन, पोटदुखी, वजन कमी होणे, उलट्या होणे, भूक न लागणे, पोट फुगणे, काळी विष्ठा होणे आणि गिळताना त्रास होणे यांचा समावेश होतो ३, ५, ६, ९. ही लक्षणे सतत राहिल्यास किंवा वाढल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

पोटाच्या कर्करोगाची मुख्य लक्षणे:

सतत अपचन आणि पोटदुखी: पोटात सतत गॅस, जळजळ किंवा वेदना होणे २, ३.


**अचानक वजन कमी होणे:** कोणताही प्रयत्न न करता झपाट्याने वजन कमी होणे १, २.

**भूक कमी होणे:** अन्नाची इच्छा न होणे किंवा लवकर पोट भरल्यासारखे वाटणे १, ६.

**उलटी होणे:** काही वेळा अन्नासोबत किंवा त्याशिवाय उलटी होणे ५.

**काळा मल** : पोटातील अंतर्गत रक्तस्त्रावामुळे विष्ठा काळ्या रंगाची होणे ३.

थकवा आणि अशक्तपणा: रक्तात हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे (रक्तपांढरी) सतत थकवा जाणवणे



**गिळताना त्रास:** अन्न घशातून खाली जाण्यास अडथळा निर्माण होणे १४.

पोटात गाठ: पोटाच्या वरच्या भागात गाठ जाणवणे २, ४.

**निदान आणि जोखीम:**

लक्षणे दिसल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने एंडोस्कोपी (एपर्वीलेޫ) आणि बायोप्सी (इर्ळ्ीޫ) द्वारे निदानाची पुष्टी केली जाते ७. धूम्रपान, मद्यपान, जास्त मसालेदार किंवा खारवलेले अन्न, आणि 'हेलिकोबॅक्टर पायलोरी' (क श्रीळ) जिवाणूंचा संसर्ग हे देखील पोटाच्या कॅन्सरचे प्रमुख जोखीम घटक आहेत

# हिवाळ्यातबदाम खाल्ल्याने होतात महत्त्वाचे फायदे; तज्ज्ञ सांगतात

पोषणतज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात रोज मर्यादित प्रमाणात बदाम खाल्ल्यास शरीराला अनेक लाभ होतात.

हिवाळ्यात बदाम खाल्ल्याने होतात महत्त्वाचे फायदे; तज्ज्ञ सांगतात...

हिवाळा सुरू झाला की, शरीराला अधिक ऊर्जेची आणि उष्णतेची गरज भासते. थंडीच्या दिवसांत योग्य आहार घेतला नाही, तर सर्दी, खोकला, अशक्तपणा यांसारख्या समस्या वाढू शकतात. अशा वेळी आहारात बदाम (–श्रोपवी) समाविष्ट करणं आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतं. पोषणतज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात रोज मर्यादित प्रमाणात बदाम खाल्ल्यास शरीराला अनेक लाभ होतात.

उष्णता आणि ऊर्जा मिळते

बदामामध्ये चांगल्या प्रकारचे फॅट्स आणि प्रोटीन असतात. हिवाळ्यात बदाम खाल्ल्याने शरीरात उष्णता निर्माण होते आणि दिवसभर ऊर्जा टिकून राहते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढते

बदामामध्ये असलेले व्हिटॅमिन ए आणि अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. त्यामुळे सर्दी-खोकला आणि संसर्गापासून संरक्षण मिळतं.

मेंदूची कार्यक्षमता सुधारते



बदाम हे मेंदूसाठी अतिशय उपयुक्त मानले जातात. नियमित बदामाचे सेवन केल्याने स्मरणशक्ती वाढते, एकाग्रता सुधारते आणि मानसिक थकवा कमी होतो.त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर दामातील पोषक घटक त्वचेला पोषण देतात, कोरडेपणा कमी करतात आणि त्वचा चमकदार ठेवण्यास मदत करतात. केस गळती कमी होण्यासाठीही बदाम उपयुक्त ठरतात.

हाडे मजबूत राहतात

बदामामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस असतात. हिवाळ्यात बदाम खाल्ल्याने हाडे मजबूत राहतात आणि सांधेदुखीचा त्रास कमी होण्यास मदत होते.

पचनक्रिया सुधारते

भिजवलेले बदाम खाल्ल्यास पचनक्रिया सुधारते. बदामातील फायबर हिवाळ्यात अनेकांना होणारा बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करतो. बदाम कसे खावेत?तज्ज्ञांच्या मते, रात्री बदाम पाण्यात भिजवून सकाळी सोलून खाल्ल्यास त्याचे फायदे अधिक मिळतात. रोज ४ ते ६ बदाम खाणे पुरेसे असते.

हिवाळ्यात आरोग्य टिकवायचं असेल, तर रोजच्या आहारात बदामाचा समावेश नक्की करा. छोटासा बदाम, पण आरोग्यासाठी मोठा फायदा देणारा असा हा सुकामेवा आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० ट क्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.शरीराच्या मजबुती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हे जीवनसत्त्व उपयोगी आहे. त्यामुळे त्याचा डोस पुरेशा प्रमाणात घेणं गरजेचं



## २ Joke — विनोद




ङकाल मी एका कानडी माणसाशी तब्बल तीन तास बोलत होतो! आणि मला तर कानडी बिलकुल येत नाही.फङ्गआँ, म्हणजे आश्चर्य आहे बुवा! मग तुम्ही खुणा करून बोलत होता तरफङ्छे हो! त्या कानडी माणसाला स्वच्छ मराठी बोलता येत होते!

## ३ Message — संदेश



suno
suno magror hum bhi
gzab ke hai lekin.
tere horor ka bus
ahteram karte hai.

## ४ Thought — सुविचार




माझ्याकडे कोणतीही विशेष प्रतिभा नाही. मी केवळ उत्कटतेने चौकस आहे. – अल्बर्ट आइनस्टाइन

**संस्कृत सुभाषित**

न गृहं गृहमित्या दुर्गृहिणी गृहमुच्यते।

अर्थ –घर म्हणजे गृहिणी, तिच्याशिवाय घर हे घर नव्हे तर ते अरण्य, पत्नी केवळ पत्नीच नसते. तिचे स्थान फार मोठे आहे. पतीच्या कुटुंबाच्या, सर्वांच्या जीवनात ती सर्वांना संतुष्ट करणारी देवताच असते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म––– रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर




## थोडक्यात/ संक्षिप्त



### हार्दिक पांड्याचा रॉकेट थ्रोने मॅच फिरली

मुंबई –विशाखापट्टणमच्या मैदानात सूरू असलेल्या सामन्यात हार्दित पाड्याने खतरनाक रनआऊट घेतला आहे. हार्दिकच्या या रॉकेट थ्रोने न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर स्वस्तात बाद झाा आहे.त्यामुळे हा सामना फिरला आहे.खरं तर या सामन्यात न्यूझीलंड २५० पर्यंत मजल मारू शकली असती, पण टीम इंडियाने त्यांना २१५ धावात रोखले आहे. न्यूझीलंडचा भारताविरूद्धचा दुसरा सर्वाधिक स्कोर आहे.प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडची सूरूवात खूपच चांगली झाली होती. न्यूझीलंडच्या डेवॉन कॉन्वे आणि टीम सिफर्टने धडाकेबाज फलंदाजी करून ८ ओव्हरमध्ये १०० धावा केल्या होत्या. त्यानंतर डेवॉन कॉन्वे ४४ धावांवर बाद झाला होता. त्याच्यानंतर रचिन रविंद्र २ धावांवर बाद झाला. त्यानंतर ग्लेन फिलिप्स मैदानात आला होता.तिकेट टिम सिफर्ट पहिल्या बॉलपासून तुफान बॅटींग करत होता. पण नंतर तो देखील ३६ बॉलमध्ये ६२ धावा करून बाद झाला होता. न्यूझीलंडक़डून टिम सिफर्टनेच सर्वाधिक खेळी केली होती. त्याच्यानंतर ग्लेन फिलिप्स २४ वर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ मार्क चॅपमन ९ धावांवर बाद झाला. त्याच्यानंतर डेरी मिचेल आणि मिचेल सँटनर मैदानात होते.

### हे ४ संघ टी-२० वर्ल्डकपची सेमीफायनल खेळणार! माजी खेळाडूची मोठी भविष्यवाणी

मुंबई –आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. स्पर्धेतील पहिला सामना ७ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचे आयोजन संयुक्तरित्या भारत आणि श्रीलंकेत केले जाणार आहे. याआधी २०२४ मध्ये झालेल्या आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने जेतेपद–ाचा मान पटकावला होता. आता सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघ जेतेपद राखण्याच्या प्रयत्नात असणार आहे. याआधी कुठल्याही संघाला मायदेशात टी–२० वर्ल्डकप जिंकता आलेला नाही. त्यामुळे भारतीय संघाकडे इतिहास घडवण्याची संधी असणार आहे. दरम्यान भारताचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने कोणते ४ संघ या स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार, याबाबत भविष्यवाणी केली आहे.

काय म्हणाला इरफान पठाण?

भारताचा माजी क्रिकेटपटू इरफाण पठाण सध्या सम ालोचकाच्या भूमिकेत आहे.

### वर्ल्डकप नाही जिंकला तर गंभीरला, गौतम गंभीरच्या भविष्याबाबत....

मुंबई –भारताचे माजी खेळाडू राहुल द्रविड यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर ही जबाबदारी गौतम गंभीरकडे सोपवण्यात आली होती. गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाने टी–२० क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. पण वनडे आणि कसोटी क्रिकेटमध्ये कामगिरीचा आलेख खालावला आहे. त्यामुळे अनेकांनी त्याच्यावर टीका केली आहे. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला. पण आगामी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा ही गौतम गंभीरसाठी खरी कसोटी असणार आहे. या स्पर्धेतील कामगिरीवर त्याचं मुख्य प्रशिक्षकपदाचं भवितव्य अवलंबून असणार आहे. दरम्यान या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी भारताचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारीने गौतम गंभीरबाबत मोठं वक्तव्य केलं आहे.गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाने मायदेशात खेळ अनेक महत्वाच्या मालिका गमावल्या आहेत.

# इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी श्रीलंकेचा संघ जाहीर, विश्वचषकाच्या तयारीसाठी शेवटची संधी

**नवी दिल्ली:** इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी श्रीलंकेने बुधवारी १६ सदस्यीय संघाची घोषणा केली. दासुन शनाका संघाचे नेतृत्व करेल. श्रीलंकेने अलीकडेच पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या संघाचे पुनरुज्जीवन केले. श्रीलंका आणि इंग्लंड यांच्यामध्ये एकदिवसीय मालिका पार पडली आणि आता या दोन्ही संघामध्ये टी२० विश्वचषकाच्याआधी तीन सामन्यांची टी२० मालिका खेळवली जाणार आहे. एकदिवसीय मालिकेमध्ये इंग्लडच्या संघाने बाजी मारली आहे आता सर्वाची नजर टी२० मालिकेवर असणार आहे. ही मालिका ३० जानेवारीपासून खेळवली जाणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी श्रीलंकेने बुधवारी १६ सदस्यीय संघाची घोषणा केली. दासुन शनाका संघाचे नेतृत्व करेल.

श्रीलंका आणि इंग्लंड ३० जानेव–ारीपासून सुरू होणाऱ्या तीन



सामन्यांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेत एकमेकांसमोर येतील. श्रीलंकेने अलीकडेच पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या संघाचे पुनरुज्जीवन केले आहे. २०२६ च्या टी–२० विश्वचषकासाठी तयारी करण्यासाठी दोन्ही संघांसाठी ही शेवटची संधी असेल.

श्रीलंका–इंग्लंड टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेचे वेळापत्रक


पहिला ढ२०ख – ३० जानेवारी, पल्लेकेले दुसरा टी२० सामना – १ फेब्रुवारी, पल्लेकेले

तिसरा टी२० सामना – ३ फेब्रुवारी, पल्लेकेले

इंग्लडविरुद्ध टी२० मालिकेसाठी श्रीलंकेचा संघ

दासुन शनाका (कर्णधार), पाथुम निसांका, कामिल मिश्रा, कुसल मेंडिस, कुसल जेनिथ परेरा, धनंजया डी सिल्वा, चारिथ असलंका, जेनिथ लियानागे, पवन रत्नायके, वानिंदू हसरंगा, दुनिथ वेललागे, महेश थेक्षाना, राष्ट्रा चॅनेशमन, प्रशांत मणिभन, प्रमोदशमन, दासुन शनाका (कर्णधार). मलिंगा.

२०२६ च्या टी–२० विश्वचषकासाठी श्रीलंकेला ऑस्ट्रेलिया, आयर्लंड, ओमान आणि झिम्बाब्वेसह गट ब मध्ये स्थान देण्यात आले आहे, तर इंग्लंडला इटली, नेपाळ, स्कॉटलंड आणि वेस्ट इंडिजसह गट क मध्ये स्थान देण्यात आले आहे. श्रीलंका आणि इंग्लंड हे दोघेही ८ फेब्रुवारी रोजी २०२६ च्या टी–२० विश्वचषकात आपल्या मोहिमांना सुरुवात करतील. इंग्लंडचा सामना नेपाळशी होईल तर श्रीलंकेचा सामना आयर्लंडशी होईल.



## जो रूट सगळ्यांच्याच हात धूवून मागे लागला... आता ब्रायन लाराचं हा रेकॉर्ड झालं उद्धवस्त!

कोलंबो –जो रूटने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावून अनेक विक्रम मोडले. या सामन्यात त्याने १११ रनची ऐतिहासिक खेळी केली. हे त्याचे २० वे वनडे शतक आणि एकूण ६१ वे आंतरराष्ट्रीय शतक होते. दरम्यान, त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक रन करण्याचा एक अनोखा विक्रमही केला आहे. जो रूट आता ब्रायन लाराला मागे टाकून सर्वाधिक रन करणाऱ्या बॅटरच्या यादीत आठव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

ब्रायन लाराला मागे टाकले

श्रीलंकेविरुद्ध १११ रन केल्यानंतर, जो रूटने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ५०६ इनिंगमध्ये २२,४१३ रन केल्या आहेत. त्याने ब्रायन लाराला मागे टाकले आहे, लाराने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २२,३५८ रन केल्या होत्या. रूटने त्याच्या शानदार कारकिर्दीत ६१ शतके आणि ११६ अर्धशतके केली आहेत.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांमध्ये फक्त सचिन तेंडुलकर, विराट कोहली, कुमार संगकारा, रिकी पॉन्टिंग, महेला जयवर्धने, जॅक कॅलिस आणि राहुल द्रविड हे रूटच्या पुढे आहेत.३४,३५७ रन – सचिन तेंडुलकर२८,२१५ रन – विराट कोहली

२८,०१६ रन – कुमार संगकारा

२७,४८३ रन – रिकी पॉन्टिंग

२५,९५७ रन – महेला जयवर्धने

२५,५३४ रन – जॅक कॅलिस

२४,२०८ रन – राहुल द्रविड

२२,४१३ रन – जो रूट

विराट कोहलीपेक्षा रूट खूप मागे

जो रूटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २२ हजार पेक्षा जास्त रन केल्या आहेत, पण तो या यादीत विराट कोहलीपेक्षा खूप मागे आहे. विराटने टी–२० आणि टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि आता तो फक्त वनडे सामने खेळतो. विराटने ६२६ इनिंगमध्ये २८,२१५ रन केल्या आहेत. रूटने ६१ शतके केली आहेत, तर विराटने तिन्ही फॉरमॅटमध्ये ८५ शतके केली आ–हेत. विराटने फक्त वनडे क्रिकेटमध्येच ५४ शतके झळकावली आहेत, जी जगात सर्वाधिक आहेत.

## टीम इंडियाला मोठा धक्का! टी–२० वर्ल्डकप तोंडावर असताना स्टार खेळाडू दुखापतग्रस्त



मुंबई –भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ५ टी–२० सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील चौथा सामना विशाखापट्टणमच्या वीडीसीए मैदानावर सुरू आहे. या संपूर्ण मालिकेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आहे. मालिकेतील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये विजय मिळवून भारतीय संघ विजयाचा चौकार मारण्यासाठी मैदानात उतरला आहे. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेईंग ११ मध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. भारतीय संघातील स्टार फलंदाज दुखापतीमुळे हा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही.

येत्या काही दिवसात आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला सुरूवात होणार आहे. न्यूझीलंडविरूद्धची टी–२० मालिका ही या स्पर्धेआधी भारतीय संघासाठी रंगीत तालीम आहे. पण या मालिकेदरम्यान भारतीय संघाचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे. मालिका सुरू होण्याआधी तिलक वर्मा आणि वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त झाले होते. त्यानंतर अक्षर पटेल दुखापतग्रस्त झाला. दरम्यान चौथ्या सामन्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. इशान किशन दुखापतीमुळे हा सामना खेळू शकलेला नाही. इशान किशनची दुखापत किती गंभीर आहे, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

नाणेफेकीच्या वेळी कर्णधार सूर्यकुमार यादवने इशान किशन आणि अक्षर पटेलच्या दुखापतीबाबत अपडेट दिली. सूर्यकुमार यादव म्हणाला, ''इशान किशनच्या जागी अर्शदीप सिंगला पुनरागमन करण्याची संधी देण्यात आली आहे. गेल्या सामन्यात त्याला दुखापत झाली होती. तर अक्षर पटेलला दुखापतीतून सावरण्यासाठी पुरेसा वेळ हवा आहे.'' मालिकेतील दुसऱ्या सामन्यात क्षेत्ररक्षण करत असताना अक्षर पटलेला दुखापत झाली होती. मुख्य बाब म्हणजे, श्रेयस अय्यरला संघात स्थान देण्यात आलं आहे, पण त्याला प्लेईंग ११ मध्ये खेळण्याची संधी देण्यात आलेली नाही.

या सामन्यासाठी अशी आहे दोन्ही संघांची प्लेईंग ११:

भारत: अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), सूर्यकुमार यादव (कर्णधार), हर्षित राणा, रवी बिश्नोई, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, रिंकू सिंग, हार्दिक पंड्या, शिवम दुबे.

न्यूझीलंड: टिम सेफर्ट (यष्टीरक्षक), डेवॉन कॉनव्हे,मार्क चॅपमन, डॅरिल मिशेल, मिचेल सँटनर (कर्णधार), झॅकरी फॉल्क्स, मॅट हेन्री, ईश सोधी, जेकब डफी, रचिन रवींद्र, ग्लेन फिलिप्स.

## पुजाराने ९९ धावांची वादळी खेळी, पण...

मुंबई –आगामी टी२० वर्ल्डकप कधी एकदा सूरू होतेय, याची उत्सुकता चाहत्यांना असताना आता तिकडे वर्ल्ड लिजेंड प्रो टी२० लीगमध्ये चेतेश्वर पुजाराने वादळी खेळी केली आहे. चेतेश्वर पुजारा ९९ वर धावांवर खेळत होता,त्यावेळेस त्याला शतकासाठी एक धाव आणि संघाच्या विजयासाठी तीन धावांची गरज होती. मात्र त्याला ना शतक ठोकता आलं, ना त्याला संघाला सामना जिंकवता आला आहे. त्यामुळे सामन्यात नेमकं काय घडलं आहे? हे जाणून घेऊयात.

खरं तर चेतेश्वर पुजारा हा गुरुग्राम थंडर्सकडून खेळत होता. या सामन्यात दुबई रॉयल्सने गुरुग्राम थंडर्ससमोर २०१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना गुरुग्राम थंडर्सची सूरुवात खूपच खराब झाली होती. कारण फिल मस्टर्ड अवघ्या ७ धावांवर बाद झाला होता. त्याच्यासोबत जरमेन ब्लॅकवुड देखील ८ धावांवर बाद झाला होता.



गुरुग्रामचे झटपट दोन विकेट पडल्यानंतर चेतेश्वर पुजाराने संघाचा डाव सावरला होता. त्याच्यासोबत कोलीन डे ग्रॅडहोमने २२ धावांची खेळी केली. त्यानंतर पुजारा आणि कर्णधार थिसारा परेराने वादळी खेळी करायला सूरूवात केली होती. या दरम्यान चेतेश्वर पुजारा तडाखेबाज फलंदाजी करत असताना तो ९९ धावांपर्यंत पोहोचला होता.त्याला शतकासाठी एक धाव आणि ग्ररुग्राम संघाला सामना जिंकून देण्यासाठी तीन बॉलमध्ये तीन धावांची आवश्यकता होती. त्यामुळे पुजारा आपलं शतक पूर्ण करून आरामात सामना जिंकवेल असे वाटत होते. पण पियुश चावलाने अख्खी मॅच फिरवली.

दुबई रॉयल्सकडून खेळणाऱ्या पियुश चावलाने चेतेश्वर पुजाराला स्टम्प आऊट केले होते.या स्टम्पिंग आऊटमुळे अख्खी मॅच फिरली होती. कारण या स्पम्पिंग नंतर चेतेश्वर पुजाराचे शकत हुकलं. त्यानंतर गुरुग्राम थंडर्सला तीन बॉलमधअे तीन धावांची आवश्यकता होती.त्यावेळेस चिराग गांधी मैदानात उतरला होता.त्याने चावलाचे दोन बॉल डॉट केले त्यानंतर शेवटच्या बॉलवर गांधी क्लिन बोल्ड झाला होता.जर ५६ वर नाबाद असलेल्या थिसारा परेराला संधी मिळाली असती तर सामन्याचा निकाल वेगळा असता.दरम्यान दुबई रॉयल्सकडून समित पटलने ६५ धावांची नाबाद खेळी केली.त्याच्यासोबत अंबाती रायडूने ४५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर दुबई रॉयल्सने २० ओव्हरमध्ये २०० धावा केल्या होत्या.

# आयसीसी क्रमवारीत भारताचे वर्चस्व, अभिषेकचे अव्वल स्थान भक्कम

### बॅटने आग ओकणाऱ्या अभिषेक शर्माने रेटिंगमध्ये झेप

दुबई –आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या ताज्या टी–२० क्रमवारीत भारतीय खेळाडूंचे निर्विवाद वर्चस्व पाहायला मिळत आहे. भार–ताचा युवा सलामीवीर अभिषेक शर्माने फलंदाजांच्या यादीत आपले अव्वल स्थान अधिक मजबूत केले असून, कर्णधार सूर्यकुमार यादवने पुन्हा एकदा दिमाखात 'टॉप १०' मध्ये पुनरागमन केले आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत बॅटने आग ओकणाऱ्या अभिषेक शर्माने रेटिंगमध्ये झेप घेतली आहे. अभिषेकचे रेटिंग ९०३ वरून आता ९२९ वर पोहोचले आहे. तो त्याच्या २०२५ मधील ९३१ रेटिंग गुणांच्या ऐतिहासिक विक्रमापासून अवघ्या २ गुण दूर आहे. आगामी सामन्यांमध्ये त्याने ही लय कायम राखल्यास तो टी–२० क्रिकेटमध्ये रेटिंगचा नवा 'हिमालय' सर करेल. भारतीय टी–२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. न्यूझीलंडविरुद्ध सलग दोन नाबाद अर्धशतके झळकावल्याचा मोठा फायदा त्याला मिळाला आहे. सूर्याने क्रमवारीत थेट पाच स्थानांची प्रगती केली आहे. तो



आता ७१७ रेटिंग गुणांसह सातव्या क्रमांकावर विराजमान झाला असून, जगातील पहिल्या १० फलंदाजांमध्ये त्याचा पुन्हा एकदा समावेश झाला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत टीम इंडियाने आधीच ३–० अशी विजयी आघाडी घेतली आहे. या विजयाचा फायदा भारतीय खेळाडूंना वैयक्तिक क्रमवारीतही मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसत आहे. चाहत्यांचे लक्ष आता अभिषेक शर्माच्या आगामी विक्रमी कामगिरीकडे लागले आहे. क्रमवारीवर नजर

### तर सूर्याची वादळी एन्ट्री

टाकल्यास, पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजांम धील अंतर आता लक्षणीयरीत्या वाढले आहे. इंग्लंडचा फिल सॉल्ट ८४९ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. अभिषेक आणि सॉल्ट यांच्यातील ही मोठी तफावत पाहता, आगामी टी–२० विश्वचषकात अभिषेक शर्मा 'नंबर वन' फलंदाज म्हणूनच मैदानात उतरण्याची दाट शक्यता आहे.

तिलक वर्मा 'टॉप ३' मध्ये कायम

भारतीय संघाचा युवा फलंदाज तिलक वर्मा सध्या खेळत नसला, तरी तो ७८१ रेटिंग गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर स्थिर आहे. अन्य फलंदाजांमध्ये इंग्लंडचा जोस बटलर (७७० रेटिंग) चौथ्या, पाकिस्तानचा साहिबजादा फरहान (७६३ रेटिंग) पाचव्या आणि श्रीलंकेचा पथुम निसांका (७५८ रेटिंग) सहाव्या स्थ–ानावर कायम आहे.सूर्याच्या पुनरागम नाचा इतरांना फटका

सूर्यकुमार यादवने टॉप १० मध्ये पुनरागमन केल्यामुळे ट्रॅव्हिस हेड, मिचेल मार्श आणि टिम सायफर्ट यांना प्रत्येकी एक स्थान खाली घसरावे लागले आहे. मात्र, तरीही हे खेळाडू टॉप १० मध्ये टिकून आहेत. सध्या आयसीसी टी–२० क्रमवारीत भारताचे तीन फलंदाज टॉप १० मध्ये आ–हेत. न्यूझीलंडविरुद्धच्या उर्वरित दोन सामन्यांनंतर या क्रमवारीत पुन्हा एकदा बदल होण्याची शक्यता आहे.



# मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला तडा जाणार नाही, असे काम करु, ग्रंथाशिवाय तरणोपाय नाही: नगरसेवक ॲड.अतिश चिकटे

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या मतदारांनी काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीला भरभरुन मतदान करुन मोठा विश्वास व्यक्त केला आहे,त्या विश्वासाला तडा जाणार नाही असे कार्य आम्ही सर्व नगरसेवक करु अशी ग्वाही देवून, नागरिकांनी जीवनाला चांगला आकार येण्यासाठी ग्रंथाचे वाचनही करावे,असे आवाहन नगर सेवक ॲड.अतिष चिकटे यांनी येथे केले.

स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन,मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित काव्य वाचन,मराठीतील साहित्यिकांचा सत्कार व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सत्काराला उत्तर देताना ॲड.चिकटे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक गुडेकरीकार अमृतराव सुर्यवंशी हे होते,मंचावर दुसरे सत्कार मूर्ती नगरसेविका निकीता रोहित सोमवंशी,कवी रमेश हणमंते,ॲड.रोहित सोमवंशी यांची उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय परिश्रमाने या देशाला संविधान बहाल केले,त्याच्या गाभ्याला हात लावण्याचा नादानपणा सत्ताधारी करण्याचा प्रयत्न करत आहेत,पण जनता आता जागी होत आहे,संविधान बदलले तर देश उध्वस्त होईल,संविधानाच्या रक्षणासाठी आम्ही रस्त्यावर येण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही असे सांगून ॲड.चिकटे म्हणाले की, गेली काही वर्षात लातूर महापालिकेत प्रशासक राज असल्याने नागरिकांना नागरी सुविधा मिळत नव्हत्या,चुकीच्यापध्दतीचा कारभार चालला होता.म्हणून मतदारांनी आमच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेवून सत्ता दिली आहे,आम्ही सर्व सत्ताधारी नगरसेवक लातूरच्या सर्व प्रभागातील शेवटचा माणूस,नागरिकांना नागरी सुविधा मिळण्यासाठी संविधानाच्या चौकटीत राहून प्रामाणिकपणे काम करणार आहोत,नागरिकांनी केवळ नागरी समस्याच नाही तर दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांसाठी आम्हाला हाक द्यावी,त्यासाठी आम्ही सदैव उपलब्ध राहू,नव्हे लवकरच त्यासाठी मिसकॉल यंत्रणा सुरु करणार असल्याचे स्पष्ट केले.सार्वजनिक ग्रंथालये ही प्रबुध्द नागरिक घडविणारे माध्यम असल्याने वाचकांनी त्याचा लाभ घ्यावा,वाचनसंस्कृती वाढीसाठी शक्य तेवढी मदत करु अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

नगरसेविका निकीता सोमवंशी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देवून प्रभागातील समस्या सोडविण्यास कटिबध्द असल्याचे सांगितले..अध्यक्षीय समारोपात अमृतराव सुर्यवंशी यांनी संविधानाचे रक्षण करण्यासाठी जागरुक राहण्याचे आवाहन केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने मराठी भाषेच्या माध्यमातून आपल्या कविता,कथा लेखनातून प्रसार प्रचार करणारे साहित्यिक रमेश हणमंते यांनी यावेळी आपल्या बहारदार कविता सादर करुन वाचकांच्या टाळ्या मिळवत,मराठी भाषेचे संवर्धन करावे असे आवाहन केले..

प्रारंभी संविधान निर्माते भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण अभिवादन करुन,ॲड.अतिष चिकटे व निकीता सोमवंशी यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे रोहण करण्यात आले. राष्ट्रगीत आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचे ग्रंथ,पुष्पमाला देवून वाचनालयाच्या उपाध्यक्षा कल्पना गायकवाड, ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी सत्कार केला.सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी प्रास्ताविक व सूत्रसचांलन केले. लिपिक संकेत होळीकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला वाचक नरेंद्रकुमार



गायकवाड,महादेव राऊत,माजी आरोग्य अधीक्षक लता राहेरकर,वैजनाथ माने,प्रियंका माने,यशवंत गायकवाड,इंदू बनसोडे,नितीन माने,राजू माने,गणपत वाव्हळे यांच्यासह अनेक बालवाचक उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते भारतीय तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. यानिमित्ताने मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

यावेळी बोलतांना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की भारतीय संविधान देशातील सर्व प्रकारच्या जनतेस जगण्याचे - अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, हक्क व अधिकार प्रदान करते. त्यामुळे सर्वांना विकासाची समान संधी देखील प्राप्त होते. याचा लाभ घेत असतांना आपण सर्वांनी आपली कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे व मेहनतीने पूर्ण केली पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या शिक्षणक्रमांची माहिती देखील दिली. त्यात प्रामुख्याने नवीन कौशल्याधारित व रोजगाराभिमुख, कृषी विज्ञान केंद्राचे व नवीन तंत्रज्ञानावर आधारित असलेले शिक्षणक्रम यांचा समावेश होता. मुक्त विद्यापीठाच्या



शीर्ष नेतृत्वाखाली सुरु असलेला महाज्ञानदीप प्रकल्प, वाढवन बंदर साठी कुशल मनुष्यबळ पुरविण्याच्या हेतूने सुरु झालेले शिक्षण प्रशिक्षणाचे काम, शेतकरी वर्गास एआय तंत्रज्ञान आधारित दिले जात असलेले शिक्षण, सामाजिक बांधिलकी म्हणून बंदिवान, तृतीयपंथी तसेच नक्षलग्रस्त भागातील युवक युवती यांच्या शिक्षणासाठी विद्यापीठातर्फे सुरु असलेले विशेष उपक्रम यांची देखील त्यांनी माहिती दिली. सन २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्याचे स्वप्न आपण सर्वांनी मिळून साकार करुया असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंपर्क अधिकारी श्री. महेंद्र बनसोडे यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, दैनंदिन वेतन व सुरक्षा कर्मचारी, विद्यार्थी, शेतमजूर आदी उपस्थित होते.

# अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवाराचे अपहरण, तीन दिवसांनंतर अर्ज माघार घेण्याच्या दिवशी केले पुन्हा प्रकट

## लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत मागास, वंचित समाजाचा सत्ताधाऱ्याकडून आवाज दाबण्याचे कारस्थान, दबावात महिला उमेदवाराचा अर्ज मागे : जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंके

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान, मागास, वंचित आदिवासी समाजाचा आवाज दाबण्याचा अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार समोर आला आहे. अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवाराला धमकी, दबाव आणि कथित अपहरण करून उमेदवारी अर्ज माघार घेण्यास सत्ताधारी पक्षाकडून भाग पाडण्यात आल्याचा थेट आरोप जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे यांनी केला आहे.

जिल्हा काँग्रेसच्यावतीने प्रसिद्ध देण्यात आलेल्या निवेदनात अभय साळुंके यांनी म्हटले आहे की, निलंगा तालुक्यातील तांबाळा गावातील अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवार अंजना सुनील चौधरी या जिल्हा परिषद निवडणुकीच्या मैदानात काँग्रेस पक्षाकडून ठामपणे उतरल्या होत्या. मात्र, निवडणूक अर्ज प्रक्रिये दरम्यान अचानक त्यांचं अपहरण करण्यात आले, यासंदर्भात त्यांच्या कुटुंबीयांनी या अपहरणाची फिर्यादी दिली होती.

तब्बल तीन दिवस त्या बेपत्ता होत्या, आणि ऐन उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या दिवशीच त्या अचानक पोलिस बंदोबस्तात प्रकट झाल्या. पोलिस बंदोबस्तातच अंजना चौधरी यांना थेट निवडणूक कार्यालयात आणण्यात आले आणि दबावाखाली उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावला. हा प्रकार केवळ एका महिला उमेदवारापुरता मर्यादित नसून, आदिवासी समाजाला लोकशाही प्रक्रियेतून बाहेर ढकलण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

निवडणूक लढवणे हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. तो अधिकार धमकी, भीती आणि दबावाच्या जोरावर हिरावून घेणे म्हणजे लोकशाहीची उघडपणे हत्या असल्याची असल्याचेही अभय साळुंके यांनी म्हटले आहे. देशात आधीच गरीब, वंचित, शोषित, मागासवर्गीय आणि आदिवासी समाजावर अन्याय होत असल्याचे चित्र असताना, अशा प्रकारे महिला उमेदवारांना लक्ष्य करून निवडणुकीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करणं म्हणजे सत्तेचा माज आणि हुकूमशाही वृत्तीचे भयावह उदाहरण असल्याचा आरोप अभय साळुंके यांनी केला आहे, इतर अनेक सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांकडून या घटनेच्या अनुषंगाने संताप व्यक्त केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणावर अद्याप सत्ताधाऱ्याकडून कोणतंही स्पष्ट स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. हा मौन म्हणजे या घटनेला मूक संमती असल्याची



संतप्त भावना जनतेत आहे.

आदिवासी महिला उमेदवारावर अन्याय झाला असेल, तर दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीला अनेक सामाजिक संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

# जनसामान्यांच्या मनात घर केलेला उमदा नेता महाराष्ट्राने गमावला - माजी आमदार धिरज देशमुख

महाराष्ट्राची आजची सकाळ अत्यंत दुःखद आणि धक्कादायक वृत्ताने झाली. बारामती येथे झालेल्या विमान अपघाताचे वृत्त खोटे ठरावे, असेच आपल्या सर्वांना वाटत होते. पण, मनाला चटका लावणारे वृत्त ऐकावे लागले.

लोकप्रिय नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राला घडविण्यासाठी धडपडणारे एक शिस्तप्रिय नेते व विकासाची दूरदृष्टी असलेले कार्यतत्पर नेते आपण गमावले आहे. या घटनेने राजकारणीतील एका लखलखत्या व धाडसी पर्वाचा अंत झाला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणावर पकड असलेले अजितदादा पवार हे एक



कणखर नेते, स्पष्टवक्ते, अतिशय कर्तबगार, धडाडीचे, प्रचंड कार्यक्षम असलेले नेते होते. प्रत्येक विषयात त्यांचा सखोल अभ्यास होता. १९८२ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी अनेक पदे भूषवली. ही प्रत्येक पदे त्यांनी जनतेच्या विकासासाठी वापरली.

एखादा शब्द दिला तर तो पूर्ण करणार, ही त्यांची ख्याती होती. त्यांनी शब्द दिला आणि तो पूर्ण झाला नाही, असे कधीच घडले नाही. त्यामुळे सर्व पक्षातील नेत्यांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. सत्ता असो किंवा नसो, ते मोठ्या तळमळीने लोकांसाठी काम करायचे. त्यांच्याकडे पाहून अनेकजण राजकारणात आले. त्यांची उणीव कधीही न भरून येणारी आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

अशा शब्दांत माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी दिवंगत नेते अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे.

# जिल्हा परिषदेच्या १० व पंचायत समितीच्या २५ जागा वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार संतोष सुर्यवंशी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या १२ गटांच्या जागांवर तसेच जिल्ह्यातील १० पंचायत समिती गणांमधील २५ जागांवर उमेदवार कायम ठेवण्यात आले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सुर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवारी सायंकाळी हॉटेल रसिका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संतोष सुर्यवंशी म्हणाले की, लातूर महानगरपालिकेप्रमाणे जिल्हा परिषद निवडणुकीतही आघाडी होण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांसोबत उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या अंतिम वेळेपर्यंत प्रयत्न करण्यात आले. मात्र, जिथे काँग्रेस जिथे स्वतः निवडून येऊ शकत नाही अश्या जागा वंचित बहुजन आघाडीच्या वाट्याला देत होते जसे कि तंबाळा खरोसा मुरुड,





सन्मानजनक तोडगा न निघाल्याने पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.

ते पुढे म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रिंगणात असून, त्यांच्यासाठी जोरदार प्रचार केला जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शाळा बंद पाडून शाळांच्या जागा स्वतःच्या संस्थेच्या घश्यात घालून त्यांच्या जागा बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना पायबंद घालण्यात येईल.

सामान्यांच्या मुलांना दर्जेदार व विनामूल्य शिक्षण, शेतकऱ्यांना खते व बियाणे मोफय बांधावर पुरवले जाईल, घरकुल योजनेसाठी ५,००००० लाख निधी, विहीर खोदण्यासाठीशेतकऱ्याच्या खात्यावर अधिक अनुदान, तसेच शेतमजुरांना शेतीकाम नसलेल्या काळात शासकीय अनुदान व रोजगाराच्या संधी देण्यासाठी ठोस धोरण राबविले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काँग्रेस राष्ट्रवादी यांनी वंचित बहुजन आघाडीचे नाव व श्रद्धेय प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर साहेबांचे नाव युती होण्याच्या अगोदर वापरण्याच्या प्रयत्न करून स्वतःचा कमकुवतपना दाखवून दिला आहे त्यांनी पक्ष्याचे नाव व फोटो कुठेही वापरू नये आमचा कुठंच काँग्रेसला पाठिंबा नाही लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करत मतदारांनी वंचितच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन संतोष सुर्यवंशी यांनी केले.

या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हा निरीक्षक सिद्धोधन सावंत, जिल्हा महासचिव ॲड. रोहित सोमवंशी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मंजूषा निंबाळकर, शहर महासचिव आकाश इंगळे, युवा जिल्हाध्यक्ष गायकवाड, डॉ. विजय अजनीकर, डॉ. हिरालाल निंबाळकर, प्रा. प्रशांत उघाडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सामान्याप्रति बांधिलकी आणि कार्यतत्पर अजितदादांची ओळख कायम स्मरणात राहील- आ. रमेशआप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी :** तळागाळातील माणसासाठी सातत्याने धडपड करणारे, शिस्तप्रिय, रोखठोक आणि प्रशासनाची जाण असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी आक्समिक निधनाने कधीही भरून न निघणारी महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. शिस्त, सामान्याप्रति बांधिलकी अन कार्याप्रति निष्ठा ही दादांची ओळख होती अशी प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या जाहीर सभेसाठी अजितदादा पवार हे मुंबईहून बारामतीकडे विमानाने जात होते. यावेळी विमानतळाच्या धावपट्टीवर लँडिंग करताना दुर्दैवी अपघात झाला आणि त्यात अजितदादांचे दुःखद निधन झाले ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, दिवसाचे १६-१७ तास सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध राहून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले असून सातत्याने गेली ३ दशके महाराष्ट्र राज्याच्या राजकीय-सामाजिक जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या या नेतृत्वाकडे असलेली सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी थक्क करणारी आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष असलेल्या अजितदादा पवार यांनी सर्वाधिक वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिले असून ते आजतागायत उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान असून लातूर ग्रामिण मतदार संघासाठी भरीव निधी देण्यासाठी त्यांचे सातत्याने वेळोवेळी सहकार्य लाभले.

दादा शेवटच्या श्वासांपर्यंत कार्यरत राहीले. त्यांच्या निधनाची बातमी अंतकरणाला चटका लावणारी आहे. त्यांना व त्यांच्यासमवेत विमानात असलेल्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून हे दुःख पेलण्याची पवार कुटुंबीयांना परमेश्वराने ताकद देवो असे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.





शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## विश्वविक्रमाचा प्रयत्न: रानी लक्ष्मीबाई कार्यक्रमांतर्गत १५ लाख मुलींना आत्मरक्षण प्रशिक्षण



धाराशिव (प्रतिनिधी)- इतिहास घडवणाऱ्या या क्रांतिकारी पावलात, महाराष्ट्र शिक्षण परिषद मंडळ (चझडझ) रानी लक्ष्मीबाई आत्मरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रभरातील सुमारे १५ लाख मुलींना प्रशिक्षण देऊन विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहे.

माननीय मंत्री दादासाहेब भुसे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राबवल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे राज्यभरातील मुलींच्या सशक्तीकरण आणि सुरक्षेत महत्त्वपूर्ण वाटचाल होणार आहे.

या उपक्रमाबद्दल बोलताना माननीय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे म्हणाले, आमच्या मुलींचे सशक्तीकरण आणि सुरक्षा हे आमचे प्राधान्य आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशासमोर आदर्श ठेवणार आहे.

हा कार्यक्रम राज्यात राबवलेला आत्मरक्षण प्रशिक्षणाचा सर्वात मोठा उपक्रम असून, युवतींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतो.

या ऐतिहासिक उपक्रमाचे नेतृत्व केल्याबद्दल महाराष्ट्र शिक्षण परिषद मंडळ माननीय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांचे हार्दिक आभार मानते.

## पळसप गटात 'अजित लाकाळ' नावाचा वादळ! उमेदवारी जाहीर होताच मतदारांत आनंदाची लाट, विरोधक धास्तावले

धाराशिव **(रामेश्वर डोंगरे)**- धाराशिव जिल्हा परिषद निवडणुकीत पळसप गटातून शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे अजित लाकाळ यांना अधिकृत उमेदवारी मिळताच संपूर्ण मतदारसंघात उत्साहाची आणि आनंदाची लाट उसळली आहे. सर्वसामान्यांशी थेट नाळ जुळलेले, २४ तास जनतेच्या सेवेसाठी तत्पर असलेले नेतृत्व म्हणून अजित लाकाळ यांच्याकडे पाहिले जात आहे.

महायुतीच्या जागावाटपात पळसप ही जागा शिवसेना शिंदे गटाला मिळणे अपेक्षित असताना, शेवटच्या टप्प्यात झालेल्या राजकीय हालचालींमुळे या जागेवर मोठी घडामोड घडली. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या राजकीय छायेत असलेले भाजप पदाधिकारी नेताजी पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. पक्षाशी थेट संबंध नसताना व मतदारसंघात ठोस पकड नसताना उमेदवारी दिल्याचा आरोप करत शिवसैनिक आक्रमक झाले होते.

याच पार्श्वभूमीवर पळसप गटात अजित लाकाळ यांना उमेदवारी मिळणे हे शिवसैनिकांसाठी दिलासा देणारे ठरले आहे. जनतेच्या सुख-दुःखात कायम पुढे असणारे, रस्ते, पाणी, वीज, शासकीय कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे अजित लाकाळ हे नाव आज मतदारांमध्ये विश्वासाचं प्रतीक बनलं आहे.

काम सांगायची वेळ येत नाही, काम आधीच होतं अशी ओळख असलेले अजित लाकाळ रात्रंदिवस सर्वसामान्यांसाठी झटताना दिसतात. त्यामुळेच पळसप गटातील तरुण, महिला, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत प्रचंड सकारात्मक वातावरण आहे.



राजकीय निरीक्षकांच्या मते, अजित लाकाळ यांची उमेदवारी म्हणजे केवळ एक नाव नाही, तर शिवसेना शिंदे गटाची ताकद दाखवणारा राजकीय संदेश आहे. आगामी काळात पळसप गटात आणखी मोठ्या राजकीय हालचाली घडण्याची शक्यता असून, या निवडणुकीत अजित लाकाळ हे निर्णायक ठरणार, हे आता स्पष्ट दिसत आहे.

## धाराशिव प्रशालेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव प्रशाला येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, धाराशिव प्रशाला, धाराशिव तसेच स्वामी रामानंद तीर्थ विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी अजित पवार यांच्या कर्तव्यनिष्ठ, समाजाभिमुख व मूल्यनिष्ठ कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या साध्या, संवेदनशील स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली अर्पण केली.

## आजचा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक- राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील

धाराशिव (प्रतिनिधी)- आजचा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक दिवसांपैकी एक आहे. काका म्हणून नाही तर आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मार्गदर्शन करणारे, धीर देणारे आणि कठीण प्रसंगी खंबीरपणे उभं राहायला शिकवणारे व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून निघून गेले आहे, ही जाणीव अक्षरशः मन पोखरून टाकणारी आहे.

लहानपणापासून राजकारण, समाजकारण आणि जबाबदारी यांचा खरा अर्थ त्यांनी कृतीतून शिकवला. शब्दांपेक्षा कामावर विश्वास ठेवणं, निर्णय घेताना लोकहित डोळ्यांसमोर ठेवणं हे सगळं त्यांच्या सहवासातून नेहमीच शिकायला मिळालं. व्यक्तिगत नात्यातील मायेपलीकडे, ते माझ्यासाठी कायम एक आदर्श आणि प्रेरणास्थान राहिले.

मन अक्षरशः सुन्न आहे. अपघात होण्याच्या काही वेळ आधीच त्यांच्याशी फोनवर संवाद झाला होता. नेहमीप्रमाणे आपुलकीने बोलणारा तो आवाज अजूनही कानात घुमतो आहे. आणि अवघ्या अर्ध्या तासात ही दुर्दैवी बातमी समजली त्या क्षणी काय वाटलं, ते शब्दांत मांडणं खूप कठीण आहे.

क्षणार्धात आयुष्य कसं संपून जातं, याची ही भीषण जाणीव प्रचंड त्रासदायक आहे. व्यक्तिगत नात्याच्या पलीकडे, माझ्यासाठी ते कायम मार्गदर्शक आणि एक भक्कम आधार होते. त्या शेवटच्या संवादाची आठवण मनात प्रचंड भावनिक कोलाहल निर्माण करीत आहे, अजूनही विश्वास बसत नाही, अजितकाका सोडून गेले हे स्वीकार करणं अजूनही शक्य होत नाही.

या घटनेने केवळ आमच्या कुटुंबाचं नाही, तर संपूर्ण राज्याचं मोठं नुकसान झालं आहे. कृतिशील, अनुभवी, लोकहितासाठी झटणाऱ्या नेतृत्वापासून वंचित झाल्याची जाणीव अधिक तीव्र होत आहे. शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांशी एकरूप होऊन काम करणारा नेता हरपल्याचं दुःख राज्याला दीर्घकाळ जाणवत राहील. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणं कठीण आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, हीच प्रार्थना.

**- राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील**

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नुर, अशफाक दोघे रा. जुना बस डेपोच्या मागे धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.२५.०१.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील मोटरसायकल ही देशपांडे स्टॅन्ड धाराशिव येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## अजित दादांच्या जाण्याने महाराष्ट्राचे कधीही भरून न येणारे नुकसान-रामदास कोळगे

धाराशिव (प्रतिनिधी)-राष्ट्रवादीचे नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्राचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे महाराष्ट्रामध्ये धडाडीने काम करणारे सर्वांना सोबत घेऊन जाणारे पहाटेच उठून लोकांच्या अडीअडचणी सोडवणारे गोरगरीब सर्वसामान्यांची छोटी मोठी कामे करणारे अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क करून सर्वांना न्याय मिळवून देणारे स्पष्टपणे बोलणारे आव्हान स्वीकारून काम करणारे जनतेचे आधारवड अशी त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती महाराष्ट्रामध्ये त्यांनी विविध पदावर काम करून सरकारच्या व सहकाराच्या माध्यमातून शेतकरी तरुण महिला अशा अठरा पगड जातीतील लोकांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले विमान अपघाताने दादांना देवाज्ञा झाली दादांच्या जाण्याने आपल्या राज्याचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

-रामदास कोळगे भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य धाराशिव

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मुज्जफर अय्युब शेख, वय ३५ वर्षे, फोरीद फजल हक शेख, वय २२ वर्षे, दोघे रा. खडगत ता. आष्टी जि. बीड यांनी दि.२५.०१.२०२६ रोजी पुर्वी एनएच५२ रोडवरील तेरखेडा येथील हॉटेल स्वाद समोर आपल्या ताब्यातील पिकअप क्र एमएच १२ पी.क्यु.६२७१ मध्ये गोवंशीय जातीचे ३६ वासरे एकुण १८,००० किंमतीचे वाहनासह २, १८, ००० गोवंशीय जातीचे वासरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना येरमाळा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ३, ११(१)(डी),(एफ)(एच) (के) सह ५, ५ (अ)(१)(२),५(ब) प्राणी संरक्षण अधिनियमसह कलम ११९ महा. पोलीस अधिनियम सह कलम ८३/१७७ मोवाका सह कलम ३२५ बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंदवला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत ज्ञानेश्वर मधुकर सुर्यवंशी, रा. हराळी ता. उमरगा जि. धाराशिव ह.मु. राम मंदीर उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२५.०१.२०२६ रोजी ज्योती पान शॉप दुकानामध्ये चौरस्ता उमरगा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, व्ही १ तंबाखुचे असा एकुण ५,७२० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला उमरगा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत अपघातग्रस्त क्षेत्रांचे सर्वेक्षण : शालेय जनजागृती व रक्तदान शिबिरातून व्यापक सहभाग

धाराशिव (जिमाका)- रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी अपघातग्रस्त क्षेत्रांचे सर्वेक्षण,शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करून नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत व्यापक जागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अपघात क्षेत्रांचे सखोल सर्वेक्षण करण्यात आले.

नळदुर्ग पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अपघातग्रस्त क्षेत्राची पाहणी मोटार वाहन निरीक्षक श्री. सौरव दडस,नळदुर्ग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.विशाल यादव, छक-ख चे प्रतिनिधी श्री.बिराजदार तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.सिद्धेश्वर मस्के व वाहन चालक श्री.बासर व श्री. बोधले यांनी करून अपघात रस्त्याचे सर्वेक्षण करत क्षेत्र निश्चित केले.

तसेच शिराढोण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अपघात क्षेत्राचे सर्वेक्षण पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्री.कोळेकर, मोटार वाहन निरीक्षक श्री.सुशांत धुमाळे,सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.सिद्धेश्वर मस्के व वाहन चालक श्री.बासर व श्री. बोधले यांनी केले.येरमाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अपघात क्षेत्राचे सर्वेक्षण सहायक पोलीस निरीक्षक श्री.भालेराव, छक-ख प्रतिनिधी कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक श्री.सुशांत धुमाळे तसेच वाहन चालक श्री.बासर व श्री.बोधले यांनी केले.तसेच ढोकी, लोहारा, परंडा व अंबी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अपघातग्रस्त क्षेत्रांचे सर्वेक्षण पोलीस अधिकारी श्री.जी.आर.खरड,मोटार वाहन निरीक्षक श्री.महेश रायबान, सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. शिवाजी बहीर व वाहन चालक श्री. निलया क्षराडे यांनी केले.

दरम्यान,रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत दि.१९ सप्टेंबर २०२६ रोजी बावची विद्यालय,परंडा येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.मोटार वाहन निरीक्षक श्री.सचिन बंग व सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. शिवाजी बहीर यांनी शालेय परिवहन समितीची बैठक घेऊन विद्यार्थ्यांना थरश्रज्ञ`प ठळसहीं, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व,वेग मर्यादेचे पालन, मद्यपान करून वाहन न चालविणे तसेच रस्ता चिन्हांची माहिती दिली. रस्त्यावर अपघात झाल्यास अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा विषयक प्रश्नमंजूषा घेऊन पारितोषिकांचे वितरण करण्यात आले तसेच माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले.

तसेच २२ सप्टेंबर २०२६ रोजी रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे सहयाद्री ब्लड बँक, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. हर्षल डाके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात वाहन चालक व मालक,मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे चालक,कार्यालयात आलेले शिकाऊ व पक्के परवाना उमेदवार तसेच सर्व नागरिकांनी सहभाग घेतला.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री.डाके यांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळा, महाविद्यालये,टोल नाके आदी ठिकाणी विविध कार्यक्रमांद्वारे जनजागृती केली जाते.रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो, त्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे त्यांनी नमूद केले.रक्तदान करणाऱ्यांना सहयाद्री ब्लड बँक तर्फे हेल्मेट व रक्तदान प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे सांगून जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले.

या शिबिरास सहयाद्री ब्लड बँकचे डॉ.संजय शिंदे,डॉ.नागेश दराडे तसेच टेक्निशियन श्री.अभिषेक, दुर्गा,गीतांजली,सबा तांबोळी, निकिता,मिशा व जिनत उपस्थित होते.याशिवाय कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक श्री.अनिल खेमनार, श्रीमती पूनम पोळ,श्री.वैभव माळी, सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. कुणाल होले,श्री.सुजित वाघमारे, श्री.महेबूब मुसा सय्यद,श्री.वाघ, अधिक्षक श्री.डी.के.लोंढे,श्री. नरसिंह कुलकर्णी,वरिष्ठ लिपीक श्री.ए.आर. राऊत,कनिष्ठ लिपीक श्री.बालाजी दत्तू वाघमारे,श्री.रोहन साखरे, श्री.रमेश कऱ्हाळे,श्रीमती संध्या राणी गवाड,करिश्मा लोहार तसेच शिपाई श्री.सरपे,श्री.एस. काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.कुणाल होले यांनी आभार प्रदर्शन केले.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649